cmyk

## संपादकीय

### काँग्रेससाठी खडतर आव्हानाचा काळ

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात नॅशनल हेराल्डशी संबंधित हवालाप्रकरणी सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने आरोपपत्र दाखल केल्याने सध्या देशातील वातावरण ढवळून निघाले आहे. याविरोधात काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला असून, देशव्यापी आंदोलनाच्या दृष्टीने पक्षाकडून हालचाली करण्यात येत आहेत. त्यामुळे पुढचे काही दिवस देशाचे राजकारण या प्रकरणाभोवती फिरण्याची चिन्हे दिसतात.

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### मुर्शिदाबाद हिंसाचार : वडील-मुलाच्या हत्येप्रकरणी झियाउल शेखला अटक

कोलकाता : बंगालमध्ये वक्फ संशोधन कायद्याविरोधात झालेल्या आंदोलनादरम्यान मुर्शिदाबाद जिल्ह्यात झालेल्या हिंसाचारात वडील आणि मुलाची हत्या करणाऱ्या मुख्य आरोपींपैकी एकाला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी रविवारी ही माहिती दिली. पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, शमशेरगंजमधील जाफराबाद येथे दोन जणांच्या हत्येप्रकरणी ही चौथी अटक आहे. अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची ओळख जाफराबादच्या शेजारच्या सुलिताला पुरबापारा गावातील जियाउल शेख अशी झाली आहे. तो १२ एप्रिल रोजी गुन्हा घडल्याच्या दिवसापासून फरार होता.

बीड - महाराष्ट्र | वर्ष -५ | अंक-०२ | सोमवार, दि.२१ एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# जेवणासाठी एक कोटी खर्च, पण शेतकऱ्यांसाठी रूपया नाही



## राजू शेट्टींचा राज्य सरकारवर हल्लाबोल

**नाशिक । प्रतिनिधी**

**सुनील तटकरे यांच्या घरी एक वाटी आमरस आणि एक मोदक खायला १.५ कोटी खर्च केला, तिथे हेलिपॅड बनवले असे म्हणत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी सरकारवर टीका केली. सरकारला लाज वाटत नाही. हजारो कोटी तिकडे खर्च करता पण शेतकऱ्यांसाठी एक रुपयाही देत नाही असे शेट्टी म्हणाले. ते नाशिकमध्ये बोलत होते.**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह रायगड दौऱ्यावर आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीदिनाचा कार्यक्रम शाह यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला. यानंतर त्यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या घरी स्नेहभोजन केले होते. याच स्नेहभोजनासाठी सरकारी तिजोरीतून तब्बल दीड कोटी रुपयांचा खर्च झाल्याचा धक्कादायक आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. त्यांनी ट्विट करून याबाबतची माहिती दिली होती. अमित शहा हे रायगडवरील कार्यक्रम आटोपून तटकरे यांच्या सुतारवाडीतील घरी जेवणासाठी गेले. जाताना रायगडावरून २० किलोमीटर असलेल्या सुतारवाडीत ते हेलिकॉप्टरने उतरले. हेच हेलिकॉप्टर उतरविण्यासाठी ४ युनिटचे हेलिपॅड तयार करण्यात आल्याचा आरोप दमानिया यांनी केला आहे. यासाठी ७ एप्रिल रोजी १ कोटी ३९ लाख रुपयांचे टेंडरही काढले होते.

> **कांद्याला सरसकट १५०० रुपये हमी भाव द्या**
>
> महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी कर्ज माफीची घोषमा केली होती त्याचे काय झाले, असा सवाल शेट्टी यांनी केला. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत होत नाही असेही शेट्टी म्हणाले. मंत्रालयात आम्ही कांदे घेऊन आंदोलन केले. जेलमध्ये गेलो. सरकारला उशिरा शहाणपण आले. कांद्याचे निर्यात शुल्क रद्द केले. वेळेवर कांदा निर्यात शुल्क रद्द न केल्याने भाव पडले ही जबाबदारी सरकारची असल्याचे शेट्टी म्हणाले. सरकारने कांद्याला १५०० रुपये हमी भाव द्यावा, आमचा नाफेडवर भरोसा नाही. १५०० रुपये सरसकट हमी भाव द्यावा असे शेट्टी म्हणाले. परभणी जिल्ह्यात १.५० लाख रुपयांच्या कर्जापायी शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्याच रात्री त्याच्या पत्नीने पण आत्महत्या केली ती महिला ७ महिन्याची गरोदर होती असे शेट्टी म्हणाले.

पान २ वर

# न्यायव्यवस्थेवर बरळणाऱ्या खासदारांवर कारवाई करणार का?

## भाजप खासदारांच्या वक्तव्यावरून काँग्रेसचा भाजपावर हल्लाबोल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**भाजप खासदार निशिकांत दुबे आणि दिनेश शर्मा यांनी न्यायव्यवस्था आणि देशाच्या सरन्यायाधीशांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले. त्यांच्या या विधानांशी भाजपचा काहीही संबंध नाही, असे स्पष्टीकरण भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी दिले. तर याच मुद्द्यावरून भाजपाचे मावळते अध्यक्ष हे दोन्ही खासदारांना कारणे दाखवा नोटीस पाठवतील का? तसेच त्यांच्यावर कारवाई का करत नाही? असे प्रश्न काँग्रेसने विचारले. भाजप खासदारांच्या वक्तव्यावरून काँग्रेसने पुन्हा एकदा भाजपला धारेवर धरले आहे.**



भाजपा खासदार निशिकांत दुबे आणि दिनेश शर्मा यांच्या न्यायव्यवस्था आणि देशाच्या सरन्यायाधीशांबद्दल केलेल्या वक्तव्यावर पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी भाष्य केले. ते म्हणाले की दोन्ही खासदारांनी केलेली वक्तव्य त्यांची वैयक्तिक वक्तव्य आहेत. भाजप त्यांच्याशी सहमत नाही आणि अशा वक्तव्याचे कधीही समर्थन करत नाही. भाजप या विधानांना पूर्णपणे नाकारते. भाजपने नेहमीच न्यायव्यवस्थेचा आदर केला आहे आणि त्यांचे आदेश, सूचना आनंदाने स्वीकारल्या आहेत. एक पक्ष म्हणून आमचा विश्वास आहे की सर्वोच्च न्यायालयासह देशातील सर्व न्यायालये आपल्या लोकशाहीचा अविभाज्य भाग आहेत आणि संविधानाच्या संरक्षणाचे मजबूत आधारस्तंभ आहेत. मी दोन्ही खासदारांना आणि इतर सर्वांना अशी विधाने करू नयेत असे निर्देश दिले आहेत. जे. पी. नड्डा यांच्या या स्पष्टीकरणावर काँग्रेसने जोरदार टीका केली आहे. काँग्रेसचे माध्यम सरचिटणीस पान २ वर

> **...तर देशात नंग्या तलवारी नाचल्या असत्या - खा. अखिलेश यादव**
>
> 
>
> झारखंडमधील गोड्डा मतदारसंघाचे भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी केलेल्या सर्वोच्च न्यायालयावरील टिपण्णीवरुन देशभरातून तीव्र प्रतिक्रीया उमटत आहेत. भाजपाच्या जर ४०० च्यावर खासदार निवडूण आले असते तर देशात रस्त्यावंर तलवारींचा व रायफलींचा नंगानाच बघायला मिळाला असता. अशा शब्दात त्यांनी थेट भाजपावरच निशाणा साधला आहे. दुबे यांनी सर्वोच्च न्यायालयामूळे धार्मिक युद्ध भडकवले जाते असे वक्तव्य केले होते. भाजपाने मात्र त्यांचे हे मत वैयक्तिक असू शकते, असे म्हणत सारवासारव केली आहे.



## उत्तरप्रदेश निवडणुकीसाठीही इंडिया आघाडी कायम

**प्रयागराज । प्रतिनिधी**

**उत्तरप्रदेशात पुढील विधानसभा निवडणूक २०२७ यावर्षी होईल. त्या निवडणुकीसाठीही इंडिया आघाडी कायम राहील, अशी स्पष्टोक्ती समाजवादी पक्षाचे (सप) अध्यक्ष अखिलेश यादव यांनी रविवारी केली. त्यामुळे काँग्रेस समवेतची हातमिळवणी अबाधित ठेवण्याच्या सपच्या इच्छेवर शिक्कामोर्तब झाले.**


मागील वर्षीच्या लोकसभा निवडणुकीसाठी विविध विरोधी पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडी स्थापन केली. त्या निवडणुकीनंतर विविध राज्यांत झालेल्या विधानसभा पान २ वर

# बडतर्फ रणजित कासले खोटारडा, त्याला निवडणूक ड्युटी नव्हतीच

## निवडणूक आयोगाने केले स्पष्ट; कासलेचा आधार घेऊन आरोप करणारे तोंडघशी; कासलेवर आयोगाच्या निर्देशानुसार गंभीर गुन्हे दाखल

**बीड । प्रतिनिधी**

वादग्रस्त व सध्या सेवेतून बडतर्फ करण्यात आलेला पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचे परळी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने व्हिडिओ द्वारे प्रसारित केलेले आरोप खोटारडे, जनतेची दिशाभूल करणारे तसेच निवडणूक आयोगावर शंका उपस्थित करणारे असून त्यात कोणतेही तथ्य नाही; रणजित कासले याला संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत, स्ट्राँग रूमच्या सुरक्षित, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी प्रक्रिया यापैकी कुठेही परळी मतदारसंघात ड्युटी देण्यात आलेली नव्हती, तो बीड सायबर विभागात नियुक्त होता, असा स्वयंस्पष्ट खुलासा राज्य निवडणूक आयोगाने अधिकृतरित्या घोषित केला आहे.



निवडणूक प्रक्रियेत स्ट्राँग रूम मध्ये ईव्हीएम मशीन ठेवलेल्या ठिकाणी आपली ड्युटी होती व तिथे ईव्हीएम मशीन सोबत छेडछाड करता यावी, यासाठी आपल्याला दहा लाख रुपये देण्यात आल्याचा बोगस आरोप रणजित कासले याने सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून केला होता. त्याची गंभीर दखल घेत निवडणूक आयोगाने बीड जिल्हा प्रशासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते, त्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या मार्फत रणजित कासले बाबत अहवाल मागवला असता रणजित कासले हा त्या काळी बीड सायबर विभागात नियुक्त होता, पान २ वर

## रेल्वेवर फेकलेला दगड लागून चिमुकलीचा मृत्यू

**सोलापूर । प्रतिनिधी**



विजयपूर - रायचूर पॅसेंजरमधून सोलापूरला येत असताना अज्ञात इसमाने पॅसेंजरवर फेकलेला दगड लागून एका चार वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाला. ही घटना रविवारी दि. २० एप्रिल रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली. शिवानी उर्फ आरोही अजित कारंगे असे त्या दुर्दैवी चिमुकलीचे नाव आहे. एप्रिल महिन्यात लच्याण येथे यात्रा असल्याने कारंगे कुटुंबीय लच्याणला गेले होते. यात्रा संपल्यानंतर रविवारी ते माघारी सोलापूरला येत होते. दरम्यान होटगी गाव परिसरात गाडी आल्यानंतर अज्ञात इसमाने गाडीवर फेकलेला दगड शिवानीला लागला. त्यात शिवानी गंभीर जखमी झाली. त्या अवस्थेत तिला सोलापुरातील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# देशात २८१ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा धोका

## मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांचा समावेश

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**हवामान बदल विषय १९८८ पासून पुढे आला. पृथ्वीचे एकूणच तापमान १.५७ अंश सेल्सिअसने वाढले आहे. उष्णता वाढल्यामुळे आरोग्य समस्याही निर्माण होऊ लागल्या आहेत. देशात २८१ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा धोका निर्माण झाला आहे. त्यात मराठवाड्यातील सर्व आठही जिल्ह्यांचाही समावेश असल्याचे प्रतिपादन पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांनी केले.**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात 'उष्णतेशी लढा' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये श्री. देऊळगावकर बोलत होते. या कार्यशाळेस जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या औषधी शास्त्र विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य, ज्येष्ठ वास्तुविशारद अविनाश हवळ, डॉ. अविनाश गरुडकर, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के तसेच शाश्वत अधिवास विभाग सेंटर फॉर सायन्स अ‍ॅण्ड डेव्हलपमेंटच्या कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती मीनाक्षी सिंह, सार्वजनिक आरोग्य चळवळ तज्ज्ञ डॉ. अनंत फडके, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, तालुकास्तरीय पान २ वर

## हिंदी सक्तीला मोहन भागवतांनी विरोध करावा; मनसेचे आवाहन

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना राज्यातील मराठी शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात मनसेने आंदोलन उभे केले आहे. या आंदोलनाच्या पार्शवभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी हिंदी सक्तीला विरोध करावा, असे आवाहन केले आहे.

मराठी शाळांमध्ये हिंदी अनिवार्य करण्याच्या निर्णयावर राज ठाकरे यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. राज ठाकरे यांनी आंदोलनाबाबतची रूपरेषा पान २ वर

## कर्नाटकचे माजी पोलिस महासंचालक ओम प्रकाश यांची हत्या

**बंगळुरु । वृत्तसंस्था**

कर्नाटक पोलिसाचे निवृत्त महासंचालक ओम प्रकाश (वय ६८) यांची हत्या करण्यात आली आहे. बंगळुरुतील त्यांच्या घरामध्ये रक्ताच्या थारोळ्यात त्यांचे प्रेत आढळले. ओम प्रकाश यांची हत्या ही कौटुंबिक वादातून झाली असल्याची प्राथमिक माहिती आहे. त्यांच्या पत्नीनेच त्यांची हत्या केल्याचा संशय पोलिसांना आहे. या घटनेमुळे कर्नाटकच्या पोलिस दलात मात्र खळबळ उडाल्याचे चित्र आहे. ओम प्रकाश हे १९८१ बॅचचे आयपीएस अधिकारी असून २०१५ ते २०१७ या काळात कर्नाटक राज्याचे पोलिस महासंचालक होते. पल्लवी असं त्यांच्या पत्नीचं नाव असून तिनेच ओम प्रकाश यांची हत्या केल्याचा पोलिसांना संशय आहे. पोलिसांनी ओम प्रकाश यांच्या पत्नीला ताब्यात घेतलं असून तिची चौकशी सुरू आहे. रविवारी संध्याकाळी ओम प्रकाश हे त्यांच्या घरी रक्ताच्या पान २ वर

### पत्नीनेच संपवल्याची माहिती

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३६.०० क्विंटल | २,४३१ | ३,१०० | २,६७० |
| ज्वारी/हायब्रिड: १५७.०० क्विंटल | १,७०० | २,९७० | २,३४६ |
| मका/लोकल:५०.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ६०.०० क्विंटल | २,३७५ | ४,४०१ | २,८६२ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,४०० | ४,४५० | ४,४३३ |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ५,५०१ | ५,५११ | ५,५०६ |

# मुख्यमंत्र्यांचे लाडक्या बहिणींना आणखी एक गिफ्ट

## आठ जिल्ह्यातील दहा हजार महिलांना ई-रिक्षा वाटप; योजनेला नागपुरातून सुरुवात

**नागपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारच्या महिला व बालविकास विभागामार्फत मार्फत महाराष्ट्रातील दहा हजार गरजू महिलाना "पिंक ई रिक्षा वाटप" करण्यात येत आहे. रविवारी (दि.२० एप्रिल) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत महिलांना सवलतीच्या दरात पिंक रिक्षा उपलब्ध करून देण्याच्या सरकारच्या योजनेची नागपूरात सुरुवात झाली आहे. दरम्यान, राज्यात एकूण ८ जिल्ह्यात दहा हजार पिंक ई-रिक्षा वाटप केल्या जात आहे. राज्यातील दहा हजार महिलांना रोजगार देण्याचा उद्दिष्ट तर या योजनेमागे आहेच. सोबतच शहरात महिलांना सुरक्षित सार्वजनिक वाहतूक तिचे साधन मिळावे, रात्री अप-रात्री महिला या पिंक इ-रिक्षाच्या माध्यमातून सुरक्षित फिरू शकतील, असे उद्दिष्टही या योजनेमागे पान २ वर



> **या ८ जिल्ह्यांचा समावेश**
>
> राज्यातील नागपूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर, अमरावती या आठ जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने पिंक रिक्षा गरजू महिलांना उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. पिंक रिक्षाच्या एकूण किमती पैकी २०% अनुदान राज्य सरकार देणार असून दहा टक्के रक्कम लाभार्थी महिलांना द्यावी लागणार आहे. तर उर्वरित ७० टक्के रक्कम सवलतीच्या व्याजदरावर कर्ज म्हणून उपलब्ध करून दिली जात आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नागपुरात या योजनेचा शुभारंभ झाला आहे.

cmyk

## अग्रलेख

# काँग्रेससाठी खडतर आव्हानाचा काळ

काँग्रेस नेत्या सोनिया गांधी व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात नॅशनल हेराल्डशी संबंधित हवालाप्रकरणी सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने आरोपपत्र दाखल केल्याने सध्या देशातील वातावरण ढवळून निघाले आहे. याविरोधात काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला असून, देशव्यापी आंदोलनाच्या दृष्टीने पक्षाकडून हालचाली करण्यात येत आहेत. त्यामुळे पुढचे काही दिवस देशाचे राजकारण या प्रकरणाभोवती फिरण्याची चिन्हे दिसतात.

नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राची स्थापना १९३८ साली देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी केली होती. त्यामुळे नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र काँग्रेस पक्षाचे मुखपत्र मानले जायचे. असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) नावाची कंपनी हे वृत्तपत्र प्रकाशित करीत असे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५६ साली असोसिएटेड जर्नलची अ-व्यावसायिक कंपनी म्हणून नोंद करण्यात आली. कालांतराने असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडने भारतभर विविध किमती मालमत्ता प्राप्त केल्या. परंतु, २००८ मध्ये वृत्तपत्र आर्थिक घाट्यात गेल्याचे कारण देत बंद करण्यात आले. २०१० मध्ये काँग्रेसने एजेएलला त्यांच्या देणग्या फेडण्यास आणि प्रकाशन पुन्हा सुरू करण्यास साह्या करण्यासाठी ९०.२५ कोटी ऊपयांचे व्याजमुक्त कर्ज देऊ केले. त्याच वेळी यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड (वायआयएल) नावाची एक खासगी कंपनी स्थापन केली गेली. सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांचा इंडियन प्रायव्हेट लिमिटेडमध्ये ७६ टक्के वाटा होता; तर उर्वरित वाटा काँग्रेस नेते मोतीलाल व्होरा आणि ऑस्कर फर्नांडिस यांच्याकडे होता, असे सांगितले जाते. कंपनीचे कामकाज बंद पडल्यानंतर अनेक व्यवहारांमुळे एजेएलचे हस्तांतर नव्याने स्थापन झालेल्या यंग इंडियन लिमिटेड (वायआयएल) कडे करण्यात आले. हे हस्तांतर आता ईडीच्या तपासाचा प्रमुख केंद्रबिंदू असल्याचे पहायला मिळते. एजेएलने २००८ मध्ये त्यांचे प्रकाशन बंद केले आणि व्यावसायिक कारणांसाठी त्यांच्या मालमत्तांचा वापर सुरू केला. एजेएलला काँग्रेसकडून घेतलेले ९०.२१ कोटी रूपयांचे कर्ज फेडायचे होते, परंतु, एजेएल ९०.२१ कोटी रूपयांच्या कर्जाची परतफेड करू शकणार नाही. त्यामुळे एजेएल कंपनी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या मालकीच्या नव्याने स्थापन झालेल्या यंग इंडियन कंपनीला ५० लाख रूपयांना विकण्यात आली. यंग इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने ५० लाख रूपयांमध्ये ९०.२१ कोटी ऊपये वसूल करण्याचा उपाय काढला आणि हे नियमांच्या विरोधात असल्याचे ईडीच्या आरोपपत्रात म्हटले आहे. ५० लाख रूपयांमध्ये नवी कंपनी स्थापन करून 'एजेएल'ची २००० कोटी रूपयांची संपत्ती आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही यामध्ये करण्यात आला आहे. या आरोपपत्रात सुमन दुबे आणि सॅम पित्रोदा यांच्याही नावाचा समावेश आहे. दुसरीकडे काँग्रेसने मात्र हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणात पैशाचा कोणताही व्यवहार झालेला नाही. संपत्तीचे हस्तांतरण झालेले नाही. तरीही केवळ सूडापोटी कारवाई केली जात असल्याचा आरोप काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी केला आहे. दुसरीकडे हरियाणातील जमीन व्यवहार भ्रष्टाचारासंबंधी ईडीकडून काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वद्रा यांचे पती रॉबर्ट वद्रा यांची सलग तिसऱ्या दिवशी चौकशी करण्यात आल्याचे दिसून आले. त्यामुळे गांधी कुटुंबाला सत्ताधाऱ्यांनी पूर्णपणे घेरल्याचे दिसत आहे.

२०१४ पासून काँग्रेसचा आलेख सातत्याने ढासळत आहे. लोकसभा निवडणुकीत तशी काँग्रेसने चांगली कामगिरी केली. पण, सत्ता खेचण्यात काँग्रेसला अपयश आले. त्यातून सावध झालेल्या भाजपाने सगळ्याच पातळ्यांवर काँग्रेसची कोंडी करण्याचे धोरण अवलंबले आहे. नॅशनल हेराल्ड हे त्याचे मूर्तिमंत उदाहरण. गांधी कुटुंब म्हणजे काँग्रेस आणि काँग्रेस म्हणजे गांधी कुटुंब अशी आजही बऱ्याचशा काँग्रेसवाल्यांची धारणा आहे. या प्रकरणात गांधी कुटुंबालाच टार्गेट करणे, हा वर्मी घातलेला घावच म्हटला पाहिजे. अर्थात या प्रकरणात न्यायालय काय निर्णय देणार, हे महत्त्वाचे असेल. यानिमित्ताने तपास संस्थांच्या दुरूपयोगाचीही चर्चा होताना दिसते. ईडीची ९० टक्क्यांवर प्रकरणे विरोधी पक्षनेत्यांविरोधातील असल्याचा दावा केला जातो. तो खरा असेल, तर तेही काही चांगले लक्षण ठरत नाही. सीबीआय, ईडी यांसारख्या संस्था निर्माण करण्यामागे एक उद्देश आहे. या संस्थांनी एखाद्या प्रकरणाचा कसून तपास करणे अपेक्षितच आहे. परंतु, तपासामध्ये कोणताही पक्षपात असता कामा नये. इतकीच अपेक्षा असायला हवी. विरोधी पक्षाच्या नेत्याला एक न्याय आणि सत्ताधाऱ्याला वेगळा न्याय, असे होता कामा नये. त्यातूनच या संस्थांची विश्वासार्हता वाढू शकते. खरे तर काँग्रेसनेही हे प्रकरण गंभीरपणे घ्यायला हवे. कारण याचा पारदर्शकतेबरोबरच पक्षप्रतिमेवरही परिणाम होऊ शकतो. काँग्रेसचा एकूणच कारभार, कथित घोटाळे यामुळेच २०१४ ला पक्षाची सत्ता गेली. आता विरोधी पक्षात असताना भ्रष्टाचाराचा हा डाग पुसला जाण्याऐवजी अधिक गडद होणार असेल, तर त्यातून पक्षाचे भविष्य आणखी अंधारात जाऊ शकते. हे बघता न्यायालयात काँग्रेसचा निश्चितपणे कस लागेल. पुढचा काळ काँग्रेससाठी जितका खडतर तितकाच आव्हानात्मक आहे, हे नक्की.

# जन सुरक्षा विधेयक विरोधात माकपचे २२ एप्रिल रोजी निदर्शने!

## नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे-डॉ.संजय तांदळे

**बीड । प्रतिनिधी**

सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३, ज्याअंतर्गत व्यक्ती व संघटना यांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध घालण्याच्या नावाखाली हे विधेयक अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे आणि भारतीय संविधानातील अनुच्छेद १९ मध्ये दिलेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करणारे आहे.हे विधेयक अत्यंत व्यापक आणि अस्पष्ट व्याख्या वापरून व्यक्ती व संघटनांवर कठोर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करणारे असून, त्याचा गैरवापर राजकीय, सामाजिक आणि विचारसरणीच्या आधारे दडपशाही करण्यासाठी केला जाऊ शकतो. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे कोणत्याही लोकशाही देशाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असून, त्यावर कोणत्याही प्रकारची बंधने लादणे



हा लोकशाही मूल्यांचा -हास आणि नागरिकांच्या हक्कांचा अवमान आहे.

या विधेयकामुळे महाराष्ट्रातील नागरी हक्क, लोकशाही मूल्ये आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम होईल. म्हणजेच सरकारच्या चुकीच्या निर्णयाविरुद्ध अथवा एखाद्या सरकारी अधिकाऱ्याने केलेल्या अन्यायाच्या विरोधात आंदोलनाच्या मार्गाने दात मागणे हे देखील बेकायदेशीर ठरल्यामुळे जनतेचा सरकार विरोधी आवाज पूर्णपणे दडपून टाकला जाणार आहे तेव्हा लोकशाही व्यवस्था जिवंत ठेवण्यासाठी डाव्या आघाडीच्या वतीने मंगळवारी दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शने आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त ईपीएस ९५ समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष डॉ. संजय तांदळे व मराठवाडा शिक्षक संघटनेचे निमंत्रक प्राचार्य डी जी तांदळे , बीड शहर बचाव मंचचे अध्यक्ष नितीन जायभाये यांनी केले आहे.

# अखेर पोलीस पाटील भरतीला लागले मुहुर्त

## प्रा.ईश्वर मुंडे यांच्या पाठपुराव्याला यश

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**गाव गाडयात शांतता व सुव्यवस्था राखून ग्रामस्थ व प्रशासन यांचा महत्वाचा दुवा म्हणून पोलीस पाटलाचे पद महत्वाचे आहे.**

परंतू मागील अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यातील १३२२ पोलीस पाटील पदांपैकी ११२२ पदे रिक्त होती. या बाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सेवा निवृत्त अधिकारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी जिल्हाधिकारी मा.अविनाश पाठक यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदन देवून





पोलीस पाटील पदांची भरती करणे बाबत विनंती केली होती.नंतर ही वेळोवेळी पाठपुरावा केला होता.अखेर जिल्हाधिकारी बीड यांनी बिंदू नामावली व सर्व प्रशासकीय बाबी पुर्ण करून बीड जिल्ह्यातील ११२२ रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदांच्या भरती बाबत जाहीरात प्रसिध्द केली असून दि.२ मे २०२५ पासून दि.१९ मे २०२५ अर्ज दाखल करता येतील.दि.२० जून २०२५ रोजी लेखी परिक्षा होईल व दि.४ जूलै २०२५ रोजी मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल. या बाबत जिल्हाधिकारी बीड यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व उप विभागीय अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

## भारतीय जनता पार्टीच्या नियुक्त्या जाहीर!

# सुनील खरे, महेश निकम, यांचा समावेश

## विकास कामे प्रत्येक घटकापर्यंत पोहचवा-भास्कर दानवे



**जालना । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हा अंतर्गत चार मंडळाच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून यात महानगर ग्रामीण मंडळ अध्यक्ष पदी संजय डोंगरे, नवीन जालना मंडळ अध्यक्ष सुनील खरे, जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम, पूर्व जालना मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे यांचा समावेश आहे.**

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सूचनेनुसार भाजपा जिल्हा कार्यालयात रविवारी (ता. २०) जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे यांच्या हस्ते नवनियुक्त मंडळ अध्यक्षांना नियुक्ती पत्रे देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रदेश निमंत्रित सदस्य विजय कामड, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, सौ.संध्याताई देठे, महानगर अध्यक्ष सतीश जाधव, अर्जुन गेही, डॉ.श्रीमंत मिसाळ, प्रा.राजेंद्र भोसले, वसंतराव शिंदे, सौ.अरुणाताई जाधव, विष्णू डोंगरे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना भास्करराव पाटील दानवे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा जास्तीत जास्त फायदा शहरातील नागरिकांपर्यंत पोहचवून आपल्या मंडळात पक्ष संघटन बळकट करावे असे आवाहन त्यांनी केले. महानगर अध्यक्ष सतीश जाधव यांनी भारतीय जनता पार्टीचे काम जालना शहरातील प्रत्येक वार्डात पोहोचवून जालना महानगरपालिकेवर भाजपा महायुतीचा झेंडा फडकविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करावेत असे आवाहन केले. सूत्रसंचालन प्रा.राजेंद्र भोसले यांनी केले तर वसंत शिंदे यांनी आभार मानले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पांढरी गावचे सरपंच सुधीर पठाडे राज्यस्तरीय आदर्श सरपंच सेवारत्न पुरस्काराने सन्मानित

**आष्टी । प्रतिनिधी**

**सामाजिक क्षेत्रात गेल्या काही वर्षातील सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी दखल घेऊन आणि दैनिक तुफान क्रांती परिवाराच्या वतीने आष्टी तालुक्यातील पांढरी गावचे युवा सरपंच सुधीर पठाडे यांच्या कार्याचा गौरव म्हणून तसेच प्रोत्साहन हेतूने २०२५ चा राज्यस्तरीय आदर्श सरपंच सेवा रत्न पुरस्काराने महाराष्ट्र राज्य सरपंच परिषद मुंबई प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, दैनिक तुफानचे महाराष्ट्र राज्य विशेष प्रतिनिधी अनिरुद्ध गायकवाड**



**यांच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.**

दैनिक तुफान क्रांती या वृत्तपत्र तसेच संपादक मिर्झा गालिब रजाक मुजावर, उपसंपादक जावेद अत्तार,कार्यकारी संपादक तनवीर मुजावर या वृत्तपत्र परिवाराकडून दरवर्षी दैनिक तुफान क्रांती वृत्तपत्राच्या वर्धापन दिना चे औचित साधून संपूर्ण महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा आदर्श सेवा गुणगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत असते. यावर्षीच्या वर्धापनदिनी आष्टी तालुक्यातील पांढरी गावचे युवा सरपंच सुधीर वैजीनाथ पठाडे यांना गावामध्ये विविध विकासकामे केल्याबद्दल तसेच आदर्श सरपंच म्हणून सामाजिक राज्यस्तरीय सेवा रत्न पुरस्कार दैनिक तुफान क्रांतीने त्यांना पुरस्कार देऊन सरपंच परिषद महाराष्ट्र राज्य मुंबई चे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, राज्य विशेष प्रतिनिधी अनिरुद्ध गायकवाड यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी समवेत आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण पोकळे व भाऊसाहेब वायसे उपस्थित होते. युवा सरपंच सुधीर पठाडे यांना सामाजिक क्षेत्रातील आदर्श सरपंच पुरस्काराने सन्मानित केल्याने आमदार सुरेश धस, माजी जि. प. सदस्य देविदास धस, युवा नेते जयदत्त धस, श्याम धस,सागर धस यांच्यासह आष्टी तालुका सरपंच परिषद तसेच पांढरी ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# धर्म रक्षक छत्रपती संभाजी राजे जयंतीच्या अध्यक्षपदी युवराज गोडसे तर सचिवपदी अमोल माने

## विविध सामाजिक उपक्रमाने संभाजी महाराजांची जयंती साजरी होणार

**बीड । प्रतिनिधी**

स्वराज्य धर्म रक्षक छत्रपती संभाजी राजे यांच्या जयंती निमित्त सामाजिक क्षेत्रात कार्यतत्पर असणारी युवकांची संघटना म्हणून पाहिले जाणारे ''महाराजा मित्र मंडळ बीड'' यांच्या वतीने यावर्षीची शंभूराजे जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करण्याचा मानस महाराजा मित्र मंडळ आणि सर्व युवकांनी केला आहे. छत्रपती शंभू महाराज यांचा ज्वलंत आणि धाडसी इतिहास सर्व युवक तसेच जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शंभू महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक उपक्रमासह विशेष इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी सर्व युवकांनी मिळून राजीव गांधी चौक येथे जिजामाता उद्यान या ठिकाणी बैठक घेऊन छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीची रुपरेषा तसेच कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये जयंती समितीच्या अध्यक्षपदी युवराज गोडसे,उपाध्यक्षपदी निखिल सानप तर सचिवपदी





अमोल माने यांची निवड करण्यात आली.या बैठकीला मार्गदर्शक म्हणून रामसिंग आण्णा टाक,सुभास सापकाळा,महेश धांडे,गणेश तांदळे,सागर बहीर,सन्नी वाघमारे,आकाश कंडेरे,भारत कांबळे,शेखर पवार,आशिष सोने,भारत कांबळे,रवी शिंदे,शेखर पवार,आशिष सोने आदिजन उपस्थित होते.

## पान १ वरून...

### जेवणासाठी एक कोटी खर्च,

एका वर्तमानपत्रात ९ एप्रिल रोजी हे टेंडर छापूनही आले होते, असे त्यांनी सांगितले होते. याच मुद्यावरुन शेट्टींनी सरकारवर टीका केली.

------------

### उत्तरप्रदेश निवडणुकीसाठीही

निवडणुकांवेळी ती आघाडी विखुरल्याचे दिसून आले. त्या आघाडीची व्यवस्था केवळ राष्ट्रीय राजकारणासाठी असल्याची भूमिका काही पक्षांनी घेतली. त्यामुळे इंडिया आघाडीच्या भवितव्याविषयी साशंकता निर्माण झाली. त्याविषयीचा प्रश्न अखिलेश यांना पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. त्यावर इंडिया आघाडी असित्वात आहे आणि राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. महाकुंभ मेळ्याच्या हाताळणीवरून अखिलेश यांनी सत्तारूढ भाजपवर जोरदार टीकास्त्र सोडले. पुढील निवडणुकीनंतर आम्हाला सत्ता मिळाल्यास महाकुंभ मेळ्याशी संबंधित गैरव्यवस्थापनाची चौकशी केली जाईल. चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडलेल्यांची खरी आकडेवारी देण्यात आली नाही. महाकुंभ मेळ्यावेळी मिळालेल्या आर्थिक उत्पन्नाविषयीही चुकीची माहिती देण्यात आली, असा आरोप त्यांनी केला.

-------------

### न्यायव्यवस्थेवर बरळणाऱ्या खासदारांवर

जयराम रमेश म्हणाले की, भारताच्या सरन्यायाधीशांवर भाजपच्या दोन खासदारांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यापासून मावळत्या भाजप अध्यक्षांनी स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र हे खासदार वारंवार द्वेषपूर्ण भाषणे देण्यासाठी कुप्रसिद्ध आहेत. भाजपच्या मावळत्या अध्यक्षांनी दिलेले स्पष्टीकरण म्हणजे डॅमेज कंट्रोल शिवाय दुसरे काहीही नाही. हे संपूर्ण राज्यशास्त्राचे उदाहरण नाही तर संपूर्ण राजकीय ढोंगाचे उदाहरण आहे. भाजपच्या अध्यक्षांनी त्यांच्याच पक्षात उच्च संवैधानिक पदावर असलेल्या एका अत्यंत प्रतिष्ठित व्यक्तीने न्यायव्यवस्थेवर वारंवार केलेल्या अस्वीकार्य वक्तव्यावर पूर्णपणे मौन बाळगले आहे. भाजपच या विधानांना पाठिंबा देते का? जर संविधानावर अशा सतत होणाऱ्या हल्ल्यांना पंतप्रधान मोदींची कोणतीही मूक मान्यता नाही, तर भाजप अध्यक्ष या खासदारांवर कठोर कारवाई का करत नाहीत? त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली का? असे प्रश्नही जयराम रमेश यांनी विचारले.

--------

### देशात २८१ जिल्ह्यांना

अधिकारी आदी दुरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. देऊळगावकर म्हणाले, की पूर्वी रात्रीच्या वेळेस निर्माण होणारा गारवा आता कमी झाला आहे. एकूण भूभागाच्या ७५ टक्के भागावर उष्णतेचा ताण वाढू लागला आहे. अशा या उष्णतेच्या समस्येविरुद्ध लढण्यासाठी सगळ्यांनी एकत्र येण्याची गरज आहे. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले, की पुढच्या पिढीला शुद्ध हवा, पाणी मिळावे यासाठी प्रत्येकाने किमान १० रोपे लावण्याचा व जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. मीनाक्षी भट्टाचार्य यांनी उष्माघात आणि त्यामुळे मानवी शरीरावर होणारे परिणाम, त्यावरील उपचार या विषयी शास्त्रीय माहिती दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांनी वाढत्या तापमान समस्येचा मुकाबला करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वय साधून काम करावे, प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर द्यावा, असे सांगितले. प्रास्ताविक मारुती म्हस्के यांनी केले. प्रवीणा कन्नडकर यांनी सूत्रसंचालन केले. जिल्हा प्रशासनाने सर्व शासकीय कार्यालयांना सौर ऊर्जेवर वीजपुरवठा करण्यासाठी ४२ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार केला आहे, अशी माहितीही या वेळी देण्यात आली.

--------

### बडतर्फ रणजित कासले खोटारडा,

त्याची ड्युटी परळी विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रियेत कुठेही नेमण्यात आली नव्हती, असे अहवालात स्पष्ट नमूद करण्यात आले असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्दी पत्रकान्वये जाहीर केले आहे. विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन सील करताना सर्वपक्षीय उमेदवारांचे प्रतिनिधी तसेच निवडणूक निरीक्षक उपस्थित होते. ज्या ठिकाणी ईव्हीएम मशीन ठेवल्या ती जागा २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणी खाली होती. त्या ठिकाणी तीन स्तरीय सुरक्षा तैनात करण्यात आली होती, ज्यामध्ये ईव्हीएम मशीनच्या सर्वात जवळ केंद्रीय पोलीस दलाचे अधिकारी कर्मचारी, इमारतीच्या परिघावर राज्य राखीव पोलीस दलाचे जवान, इमारतीच्या बाहेर जिल्हा पोलीस दलाचे कर्मचारी नियुक्त होते. तसेच ईव्हीएम मशीनच्या टेंपरिंग बाबत कोणतीही तक्रार कुठल्याही राजकीय पक्षाने केलेली नाही, रणजीत कासलेचा या प्रक्रियेशी कोणताही संबंध येत नाही. बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याने केलेले आरोप निराधार तथ्यही दिशाभूल करणारे तसेच लोकशाहीच्या सर्वात महत्त्वाच्या असलेल्या निवडणूक प्रक्रियेवर नाहक संशय निर्माण करणारे व गंभीर असल्याचे देखील निवडणूक आयोगाने आपल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. तसेच सदर निवडणूक प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक शांततेत आणि सुरक्षित पार पडल्याचे सुद्धा निवडणूक आयोगाने स्पष्टपणे नमूद केले आहे. रणजीत कासले याने आपल्या खात्यावर आलेल्या दहा लाख रुपयांबाबत जी माहिती दिली होती, ही माहिती देखील खोटी असल्याचे उघड झाले असून सदर पैसे त्याने सुदर्शन काळे नामक अंबाजोगाई येथील एका व्यावसायिकाकडून उसने घेतले होते तसेच त्यातील अडीच लाख रुपये अजूनही परत केले नसल्याची तक्रार स्वतः सुदर्शन काळे यांनी बीड जिल्हा पोलीस दलाकडे केली आहे. मात्र रणजीत कासले याने वेगवेगळ्या व्हिडिओच्या माध्यमातून केलेल्या आरोपांचा आधार घेत परळीच्या निवडणूक प्रक्रियेवर विविध आरोप करणारे राजकीय पुढारी मात्र चांगलेच तोंडघशी पडले आहेत. तर दुसरीकडे निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परळी तहसीलच्या निवडणूक विभागाने रणजीत कासले यांच्या विरोधात परळी पोलिसात फिर्याद दिली असून रणजीत कासले याच्यावर विविध कलमांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

-----------

### कर्नाटकचे माजी पोलिस महासंचालक

थारोळ्यात पडल्याचे समोर आले. या घटनेची माहिती ओम प्रकाश यांच्या पत्नीनेच पोलिसांना दिली.

-----------

### हिंदी सक्तीला मोहन

मांडली आहे. मनसे नेते देशपांडे यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, आम्ही या विषयात काय करणार, हे येत्या दिवसांत दिसेलच, पण एक सांगतो की आमचा संघर्ष हा टोकाचा असणार आहे. विविधतेत एकता हा आपला नारा आहे. मग, ही विविधताच तोडायला सरकार निघाले आहे. राष्ट्रगीतातही सर्व भाषांचा उल्लेख असल्याचे देशपांडे म्हणाले.

-----------

### मुख्यमंत्र्यांचे लाडक्या बहिणींना

असल्याची प्रतिक्रिया राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली आहे, पिंक इ-रिक्षा योजनेच्या पहिल्या टप्प्याचा वितरण नागपुरात करतो आहे, याचा आनंद आहे. नागपुरात २००० महिलांना पिंक रिक्षा दिल्या जातील. लाडकी बहीण योजनेसारखीच ही पिंक इ -रिक्षा योजना आहे. या माध्यमातून महिलांना पायावर उभा राहता आले पाहिजे असा उद्देश आहे. तसेच कामकाजी महिलांना प्रवासात सेफ, सुरक्षित वातावरण मिळावे, म्हणून महिलाद्वारे चालवल्या जाणाऱ्या इ-रिक्षा उपलब्ध करून देण्याचा उद्दिष्ट आहे. असेही मुख्यमंत्री म्हणाले. महिलानी महिलांसाठी अशी ही रिक्षा असणार आहे. मात्र यात पुरुषांनी बसू नये, असा त्याचा अर्थ नाही. जसं महिला त्यांच घर संसार चांगलं चालवतात, तशीच इ-रिक्षा ही चांगली चालवा, सर्वांना सुरक्षित ठेवा. सर्व लाभार्थी महिलांना शुभेच्छा देत देवेंद्र फडणवीसांनी आपले मत व्यक्त केले आहे. ते नागपुरातील कार्यक्रमात बोलत होते.

----------

## पत्रकार प्रशांत लाटकर यांचा संघर्षभूमीच्या वतीने सत्कार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संघर्षभूमीवर संपूर्ण वर्षभर विविध उपक्रम आणि कार्यक्रम होत असतात. शिवाय १४ दिवशीय भीमजयंती महोत्सव देखील मोठ्या थाटात व उत्साहाने साजरा होतो. या सर्व कार्यक्रमांच्या व उपक्रमांच्या बातम्या नियमितपणे दैनिक मराठवाडा साथी या दैनिकात प्रसिद्ध होत असतात. यात पत्रकार प्रशांत लाटकर यांची अत्यंत महत्वाची भूमिका आहे. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव संयोजन समिती - २०२५ च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

ॲड शाम तांगडे यांच्या हस्ते त्यांचा शाल , पुष्पगुच्छ , सन्मानपत्र , सन्मानचिन्ह व भारताचे संविधान हा ग्रंथ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन संघर्षभूमी येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

या आभार प्रमाणपत्रात असे म्हटले आहे की आपण गेली वर्षभर संघर्षभूमीवर होणाऱ्या विविध कार्यक्रमांचे वृत्तांकण करून आपल्या दैनिकात त्यास नियमित प्रसिद्धी देत आहात. कोणत्याही प्रकारचा व्यवसायिक लाभ नसतांना किंवा कधीही जाहीरातीची अपेक्षा न करता आपण हे कार्य करत आहात. सामाजिक बांधिलकी जपणारी अशी निरपेक्ष पत्रकारिता व आपल्या सारखा निरपेक्ष पत्रकार यांनाच ही बाब शक्य आहे. सर्वसामावेशी व समाजाभिमुख पत्रकारिता करणारे पत्रकार म्हणून आपले हे कार्य आमचा उत्साह वाढवणारे आहे. करिता आपल्या बद्दल असलेल्या निर्मळ स्नेहाचे प्रतिक म्हणून आम्ही हे आभार प्रमाणपत्र आपणास देत आहोत !

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ॲड संदीप थोरात यांनी केले. प्रास्ताविक संजय हतागळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ गणेश सुर्यवंशी यांनी केले. याप्रसंगी डॉ किर्तीराज लोणारे , विश्वनाथ सावंत , सुभाष घाडगे , बलभीम बनसोडे , वसंत वाघमारे , नरसिंग तरकसे , ॲड दिलीप गोरे , चंद्रमणी गोवंदे , द्रुपदाआई सरवदे आदींची उपस्थिती होती.

# पोलीस पाटलांची भरती सुरु!



## भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या मागणीला यश

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ११२२ पोलीस पाटील रिक्त पदांची भरती त्वरित करावी अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री बावनकुळे यांचेकडे केली होती या मागणीची दखल घेऊन मा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी उपविभागीय अधिकारी यांना भरती बाबत आदेश दिले आहेत.

बीड जिल्ह्यात कोरोना काळापासून आजपर्यंत जवळपास ८५ टक्के गावांमध्ये पोलीस पाटील हे पद रिक्त होते. पोलीस पाटील हे पद ग्रामीण भागातील जनता व प्रशासनाच्या मधील महत्वाचा दुवा आहे. जेणे करुन प्रशासनास गावातील घडामोडी या त्वरीत कळतात व त्यामुळे प्रशासनास शासन चालवणे सोयिस्कर होते. व ग्रामीण भागातील गुन्हेगारीलाही त्यामुळे आळा बसतो.

सद्यास्थितीत आज बीड जिल्हयामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले आहे. पोलीस प्रशासनही सद्य परिस्थीतीमध्ये ग्रामीण भागापर्यंत पोहचू शकत नाही. आज मितीला बीड जिल्हयात जवळ जवळ १३२२ पैकी ११२२ रिक्त पदे असून २०० पोलिस पाटील कार्यरत आहेत. पोलिस पाटलांची रिक्त पदभरती झील्यास बीड जिल्हयातील सुशिक्षीत बेरोजगारांना नौकरी मिळून रोजगार मिळेल. बीड जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था पाहता पोलिस पाटलांची रिक्त पदे भरणे अत्यंत आवश्यक होते.

याबाबत त्वरित भरती करण्यात यावी अशी मागणी होत बीड जिल्हा भाजप अध्यक्ष शंकर देशमुख यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली होती.

देशमुख यांच्या या निवेदनाची महसूल मंत्री यांनी देखील त्वरित दखल घेऊन जिल्हाधिकारी बीड यांना कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. या अनुषंगाने जिल्हाधिकारी श्री अविनाश पाठक यांनी जिल्ह्यातील माजलगाव,बीड,पाटोदा,अंबाजोगाई,परळी वै.उपविभागीय अधिकारी यांना भरती बाबतचे निर्देश देऊन भरतीचे वेळापत्रक दिले आहे दि.२ मे पासुन अर्ज स्वीकारण्या सुरवात करण्यात येणार आहे दि. १९ मे पर्यंत अर्ज स्वीकारले जातील व दि.२० जूनला लेखी परिक्षा होईल व दि.४ जुलै रोजी तोंडी मुलाखती होऊन नियुक्ती मिळतील अनेक वर्षापासून पोलीस पाटील भरतीचा रखडलेला प्रश्न अखेर जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचेमुळे मार्गी लागला.

## अमोल मुळे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार बीड येथील दै. दिव्य मराठीचे पत्रकार अमोल भास्कर मुळे यांना जाहीर करण्यात आला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी या पुरस्काराची घोषणा केली.



बीड येथील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने १७ वर्षांपासून संविधान दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यंदाही पुरस्कारासाठी निवड समितीची बैठक नुकतीच पार पडली. यामध्ये पत्रकारिता क्षेत्रातून आदर्श पत्रकारिता पुरस्कार दै. दिव्य मराठीचे पत्रकार अमोल मुळे यांना जाहीर करण्यात आला. सन्मानचिन्ह, संविधानाची प्रत, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. ४ मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. अमोल मुळे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून वंचित घटकांच्या समस्या मांडल्या आहेत. कृषी, आरोग्य, व सामिजक क्षेत्रातील बातमीदारीमध्ये त्यांनी छाप पाडलेली आहे. अभ्यासू व संवेदनशील पत्रकार अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना जाहीर केला गेला. अमोल मुळे यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाचे जिल्हा युवा पुरस्कार, राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार, बेटी बचाओ, बेटी पढाओ पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार मिळालेले आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे स्वागत होत आहे.

## विठ्ठल रुक्मिणी मंदिर ,अंबिका नगर, पांगरी रोड बीड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

बीड येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर अंबिका नगर पांगरी रोड येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त विसाव्या शतकातील महान संत सद्गुरू ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या कृपा आशीर्वादाने व परमपूजनीय गुरुवर्य तपो निधी श्री नारायण माऊली महाराज भाऊ यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली व शुभ हस्ते चैत्र कृष्ण ०८ रोज सोमवार दिनांक २१-४-२०२५ ते चैत्र कृष्ण १४ रोज शनिवार दिनांक २६-४-२०२५ पर्यंत भव्य दिव्य अशा अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केलेले आहे.

सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम, स .७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण ,११ ते ०१ गाथा भजन, २ ते ४ भावार्थरामायण, व ४ ते ५ ज्ञानेश्वरी प्रवचन ,सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ रात्री ८ ते १० हरिकीर्तन व नंतर हरी जागर होईल.

दिनांक २१-४-२०२५ रोजी ४ ते ५ या वेळेत हरिभक्तिपरायण अनंत महाराज कुलकर्णी देवा यांचे प्रवचन तर रात्री ८ ते १० या वेळेत हरिभक्ती परायण श्री दिगंबर महाराज माऊली संस्थान श्रीक्षेत्र उत्तरेश्वर पिंपरी यांचे कीर्तन होईल .

वरील तारखेच्या वरील वेळेतच

दिनांक २२-४-२०२५ रोजी हरिभक्त परायण श्री संतोष महाराज तौर यांचे प्रवचन तर श्री मनोज देव महाराज उंबरीकर यांचे कीर्तन होईल. दिनांक २३-४-२०२५ रोजी ह भ प अरुण नाना डाके माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती बीड यांचे प्रवचन तर हरिभक्ती परायण सिद्धेश्वर महाराज बागलाने काकडहिरा यांचे हरिकीर्तन होईल. दि.२४-४-२०२५ रोजी अरुणकुमार समदानी बीड यांचे प्रवचन तर २ ते ४ या वेळेत अध्यात्मिक महिला स्वाध्याय मंडळ बीड यांचा गीता पाठ होईल.व रात्री ज्ञानेश्वर महाराज मस्के नाथ पैठण यांचे कीर्तन होईल.

दिनांक-६-२०२५रोजी श्री रामहरी रसाळ गुरुजी यांचे प्रवचन तर हरिभक्ति परायण नवनाथ महाराज नाईकवाडे ज्ञानेश्वर वारकरी शिक्षण संस्था पांगरी यांचे हरिकीर्तन होईल.

दिनांक २६-४-२०२५ रोजी सकाळी ८ ते १० या वेळेत हरिभक्त परायण तपोनिधी गुरुवर्य नारायण महाराज भाऊ माऊली संस्थान श्रीक्षेत्र पिंपरी यांचे कीर्तन होईल व आरतीनंतर महाप्रसाद होईल. या कार्यक्रमात प्रख्यात गायक व वादक यांची उपस्थिती राहणार आहे. तरी बीड परिसर व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन संत श्रेष्ठ सद्गुरु श्री ज्ञानेश्वर माऊली उत्तरेश्वर पिंपरी सेवा प्रतिष्ठान व अंबिका नगर मधील समस्त भाविक भक्तांनी केले आहे.

पान ६ वरून...

### बडतर्फ पीएसआय रणजीत

ऋषिकेश अण्णासाहेब लोमटे व सुरज किर्दंत हे दोन मित्रही उपस्थित होते. त्यानंतर अनेक वेळा मागणी करूनही कासले याने पैसे परत केले नाहीत. कधी लातूरमधील प्लॉट विकण्याचे तर

कधी आईच्या लॉकरमधील सोनं गहाण ठेवण्याचे आश्वासन देत वेळकाढूपणा केला. अखेरीस, माझी गाडी खाजगी सावकाराकडे ठेवून मला व्याजावर पैसे मिळवून दे आणि आपला व्यवहार संपवू असा सल्ला देत त्याने फसवणुकीची परिसीमा गाठली. त्यानंतरही

त्याने प्लॉट विकून पैसे देतो असा पुन्हा वेळकाढूपणा केला. वारंवार कॉल करूनही कासलेने पैसे दिले नाहीत. अखेर चौधरी यांनी अंबाजोगाई शहर ठाणे गाठून कासलेच्या विरोधात तक्रार दिली. सदर तक्रारीवरून रणजीत कासले याच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पीएसआय मनोज निलंगेकर करत आहेत. दरम्यान,

विविध ठिकाणी दाखल झालेल्या गुन्ह्यानंतर अंबाजोगाईतही फसवणुकीचा प्रकार समोर आल्याने कासलेचा पाय आणखी खोलात गेला आहे. कासलेला दोन दिवसापूर्वीच बीड पोलिसांनी पुण्यातून ताब्यात घेऊन बीडला आणले आहे.

### पांगरी येथे आज व

महाराज मठाधिपती गहिनीनाथगड यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाने अखंड हरिनाम सप्ताह व लक्ष्मण शक्ती यात्रा उत्सवाची सांगता होणार आहे.यात्रा उत्सव प्रित्यर्थ दि.१३ ते २२/०४/२०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह मध्ये प्रसिद्ध नामांकित किर्तनकारांचे किर्तन आयोजित केले होते.या किर्तनाचा भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घेतला.हा यात्रा उत्सव पंचक्रोशीत मोठ्या उत्साहात संपन्न होतो.या यात्रेला पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने येऊन श्री हनुमंत बजरंगबली चे दर्शन घेतात. यात्रेत मिठाई,खेळणी,रहाट पाळणे, रसवंती,थंड पेयाची,संसार उपयोगी वस्तूंची दुकाने मोठ्या प्रमाणात येऊन यात्रेची शोभा वाढवतात.

### महात्मा फुले व डॉ बाबासाहेब

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा प्रा सुरेखा सिरसाट खंडाळे ,आभार प्रदर्शन शोभा बनसोडे मॅडम, तर अध्यक्षीय समारोप गुलाबराव वाघमारे यांनी केला. या वेळी बँक ऑफ बडोदा येथे असिस्टंट मॅनेजर म्हणून पद स्थापना प्राप्त झाल्याबद्दल कु श्वेता गायकवाड, सिद्धांत संदीप कापसे यांचा डॉ राजेश इंगोले आणी इतर मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई

विद्यार्थ्यांसोबत सुद्धा स्पर्धा परीक्षा,इतर मार्गदर्शन या निमित्ताने जोडलेले आहेत.उपक्रमशील गुरूजी म्हणून त्यांची ओळख आहे. भूगोलाच्या साक्षीने इतिहास शिकणे हा त्यांचा छंद असून या छंदासाठी ते गडकोट ,ऐतिहासिक स्थळांची भटकंती करत असतात .भटकंतीतून आलेल्या अनुभवांचा अध्यापनात वापर केला जातो.त्यामुळे मुलांना जिवंत अनुभवाची शिदोरी मिळते. कल्याण घोलप यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ जिल्हा शाखा बीड यांच्याकडून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. शिक्षक संघाचे तालुका अध्यक्ष बंडू घोरड, शिवुर्जा प्रतिष्ठानचे सचिव कचरू चांभारे,अंकुश निर्मळ,रमेश गाडे,मोतीराम आवारे यांनी कल्याण घोलप यांचे अभिनंदन केले.

## आंतरभारती अंबाजोगाईची तारांगण भेट

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आंतरभारती शाखा आंबाजोगाई च्या वतीने १५ एप्रिल रोजी योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या गोदावरी कुंकुलोळ कन्या शाळेच्या आवारात तारांगण प्रकल्पास भेट देण्यात आली. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे यांच्या कल्पनेतील विज्ञान केंद्राची सुरुवात केली आहे. तारांगण हा विज्ञान केंद्राचा एक भाग आहे. खगोल अभ्यासक व योगेश्वरी माध्यमिक शाळेचे शिक्षक हेमंत धानोरकर यांनी तारांगण व परिसरातील विज्ञान केंद्राची खूप अनमोल माहिती दिली. शंभर रुपये फी भरून आंतरभारतीच्या ३५ जणांनी तारांगण पाहिले.



ताऱ्यांचे विश्व, तारका समूह, पृथ्वीची माहिती, ताऱ्यांचे वय किती, या सारख्या खगोलिय घटनांची अनमोल माहिती मिळाली. यासोबतच काही वैद्यानिक खेळणी, कोडी पण खेळायला व अनुभवायला मिळाली. एक उत्तम अनुभव आम्ही सर्वांनी घेतला. पूर्वी तारांगण पाहायचे असेल तर मुंबई, हैद्राबाद, नागपूर या ठिकाणी जावे लागत असे, पण आत्ता योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या पुढाकारामुळे अंबाजोगाई मध्ये तारांगण पाहण्याची सोय केली आहे. त्यामुळे बीड जिल्हाच नाही तर संपूर्ण मराठवाडा विभागातील विद्यार्थी, शिक्षक, पालक, खगोल अभ्यासक यांना या तारांगण पाहण्याचा नक्कीच फायदा होईल यात तीळ मात्र शंका नाही.हा कार्यक्रम आंतरभारती शाखा अंबाजोगाई च्या अध्यक्षा प्रा.शैलजा बरूरे, संयोजक महावीर भगरे यांच्या योग्य नियोजनातून व अमर हबीब यांच्या संकल्पनेतून संपन्न झाला.




**बीड : शिवसंग्राम च्या अध्यक्ष ज्योतीताई मेटे आणि आरोग्य दूत ओम प्रकाश शेटे यांची बीड शहरातील एका कार्यक्रमांमध्ये भेट झाली. यावेळी त्यांनी आरोग्य सुविधांवर चर्चा केली. बीड जिल्ह्याला या सुविधांचा जास्तीत जास्त रुग्णांना लाभ मिळावा अशी अपेक्षा ज्योतीताई मेटे यांनी व्यक्त केली यावेळी शिवसंग्राम चे कार्यकर्ते सुहास पाटील उपस्थित होते.**

### टी.सी.हरवला आहे

अशोक बळीराम थोरात रा. बनकरंजा ता. केज.जि. बीड यांचा दहावी पास चा टीसी व इत्तर कागदपत्रे केज बस्थानक परिसरात हरवला आहे तरी कोणाला आढळून आल्यास खालील नंबरवर सपर्क साधावा मो. क्र. ९७६२१५५९८२

## व्यवस्थेचा बदला घेण्यापेक्षा व्यवस्थाच बदलविणारे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते -केशव वाघमारे यांचे प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

व्यवस्थेचा बदला घेण्यापेक्षा व्यवस्थाच बदलविणारे विचार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे होते असे मत प्रसिद्ध साहित्यिक केशव वाघमारे यांनी व्यक्त केले. बीड येथील सम्राट प्रतिष्ठान द्वारा संचलित छत्रपती शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र बीड यांच्या वतीने आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहामध्ये भिवा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रवास या विषयावर व्याख्यान देत असताना प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्रावर आधारित भिवा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रवास या विषयावर व्याख्यान देत असताना ते पुढे असे म्हणाले, मानवी समाजाच्या नियमाची जडणघडण बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या चरित्रातून केलेली आहे. अनमोल अशा आत्मविश्वासाच्या जोरावर भिवा ते बाबासाहेब आंबेडकर असा क्रांतिकारी प्रवास त्यांनी केला हे सांगत असताना प्रत्येक सामान्य माणसाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये विस्मयकारक बदल घडवून आणण्याची क्षमता असते असे देखील त्यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र घडत असताना समाजामध्ये





ऐक्य निर्माण होण्यासाठी आणि व्यवस्थेमध्ये बदल घडून आणण्यासाठी त्यांनी वेळोवेळी अनेक क्रांतिकारी विचारांची पेरणी देखील केली. जे व्यक्ती व्यवस्थेला सहन करून जगतात ते जगण्यापलीकडे काहीच करू शकत नाहीत तर जे व्यक्ती व्यवस्थेला सहन न करता क्रांतिकारी मार्गाचा अवलंब करून मार्गक्रमण करत असतात त्यांचेच रूपांतर महापुरुषांमध्ये होत असते असे मत देखील साहित्यिक केशव वाघमारे यांनी पुढे बोलताना मांडले. भिवाचे रूपांतर जेव्हा बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये होत होते त्या प्रत्येक अवस्थेमध्ये त्यांनी मन आणि मेंदू यामध्ये बदल घडून आणले सामान्यत्वातून असामान्यत्वाकडे प्रवास त्यांनी केला आणि त्याचाच आदर्श आज घेण्याची गरज आहे , असे मत त्यांनी मांडले.

आदिवासी संशोधन प्रशिक्षण संस्था पुणे व डॉ .बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे आणि छत्रपती शाहू महाराज स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक समता सप्ताह आयोजित करण्यात आला होता या समारंभाचे अध्यक्ष म्हणून डॉ. संजय सावते उपस्थित होते तर उद्घाटन म्हणून डॉ. धम्मपाल घुमरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.प्रकाश खळगे,प्रा. राम परजणे,प्रा. नितीन सरकटे, गजानन शिंदे, अनिल दाभाडे, प्रा.नीताताई पाईकराव, एडवोकेट सायली सुतार आदींची उपस्थिती होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह अंतर्गत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार व आजची प्रासंगिकता या विषयावर मा. डॉ. मनोहर सिरसाट यांचे व्याख्यान संपन्न झाले या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिद्धार्थ सिंगारे तर प्रमुख पाहुणे संगमेश्वर आंधळकर आणि कॉम्रेड ज्योतीराम हूरकुडे हे होते. सामाजिक समता स्वतःचा एक भाग म्हणून सलग अठरा तास अभ्यास अभियान या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले या अभियानाचे उद्घाटन प्रा. राम परजणे यांनी केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीधर आघाव हे होते प्रमुख अतिथी म्हणून प्रा. भरत खेत्रे,प्रा. अविनाश वडमारे, डॉ. बाळासाहेब जावळे आधी उपस्थित होते. सामाजिक समता सप्ताह दरम्यान निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. हा संपूर्ण सप्ताह संस्थेचे सचिव राहुल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला तसेच सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख प्रा. अविनाश वडमारे, श्रीमती अंबिका शिंदे, श्री सुनील डोंगरे, प्रा. भरत खेत्रे, प्रा. डॉ. श्रीधर आघाव, प्रा. डॉ. बाळासाहेब जावळे, श्री दीपक सोनवणे, श्री सुनील काकडे, श्री दिलीप गायकवाड, श्री सचिन काकडे, श्री मुकेश निसर्गंध, सौ दिपालीताई निर्मळ आणि सौ जयश्रीताई तायडे यांनी परिश्रम घेतले.

जा.क्र.530/उपनि/वि-2/कलम101/जाहीर प्रगटन/2025 दिनांक - 15/04/2025

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 जाहीर प्रगटन**

कार्यालय तालुका उपनिबंधक सहकारी संस्था बीड.

मिराई नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित बीड या संस्थेने खालिल व्यक्तीस कर्ज वाटप केलेले आहे.सदर कर्ज थकीत असल्यामुळे त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता जप्त करुन कर्जाची वसुली करण्यासाठी सदरहुन संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 101 अन्वये कार्यवाही करण्यासाठी वसुली प्रमाणपत्राच्या मागणीसाठी प्रकरण दाखल केले आहे.सदर कर्जदार व त्यांचे जामीनदार यांना कार्यालयाने प्रकरणाच्या सुनावणीसाठी पोष्टाने नोटीसा पाठवल्या आहेत.परंतु काही कर्जदार व जामीनदार दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्याने, गावी हजर नसल्याने किंवा घेण्यास इनकार असल्याने परत आल्या आहेत.तर काही प्रकारच्या नोटीसा तालीम झाल्याच्या पावत्या कार्यालयास मिळाल्या नाहीत करिता या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,सदर वसुली प्रमाणपत्र देण्यापुर्वि आपले म्हणने मांडण्यासाठी उपनिबधक सहकारी संस्था तालुका बीड सहकार शक्ती इमारत, दुसरा मजला, जालना रोड, बीड येथे दिनांक 29/04/2025 रोजी वार मंगळवार सकाळी ठिक 11.00 वाजता प्रत्यक्ष अथवा विधीद्वारे उपस्थित राहावे. आपले लेखी अथवा तोंडी म्हणने उत्क दिवशी दाखल करावे.आपण हजर राहुन म्हणने मांडले नाही तर आपले काही म्हणने नाही,असे गृहीत धरुन प्रकरणी निर्णय देण्यात येईल.याची विशेष नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कर्जदार यांचे नाव व पत्ता | जामीनदार यांचे नाव व पत्ता | सुनावणी दिनांक | वसुल पात्र रक्कम रुपये | चल / अचल मालमत्तेचे विवरण | शाखा व कर्ज खाते क्र |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **श्री. चिकणे ईश्वर भिमराव** पत्ता - गंगावाडी, पोस्ट - तलवाडा, ता. गेवराई जि.बीड | 1.**श्री. चिकणे ज्ञानदेव भिमराव** पत्ता - गंगावाडी, पोस्ट - तलवाडा, ता. गेवराई जि.बीड 2.**श्री. उबाळे महेश सखाराम** पत्ता - चऱ्हाटा, ता. बीड जि.बीड 3. **श्री. चिकणे भिमराव रामभाऊ** पत्ता - गंगावाडी, पोस्ट - तलवाडा, ता. गेवराई जि.बीड | 1) 04/04/2025 2) 15/04/2025 3) 29/04/2025 | दि. 31/01/2025 रोजी रु. 40,115 /- व दि.01/02/2025 पासुनचे व्याज व अतिरिक्त खर्च | - | मुख्य शाखा, बीड / कर्ज खाते क्र 193/2000016 |
| 2 | **श्री खोड रामेश्वर कचरु** पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड | 1.**श्री बजगुडे नारायण ज्ञानोबा** पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड 2.**श्री खोड परमेश्वर जनार्धन** पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड 3.**श्रीमती खोड स्वाती रामेश्वर** पत्ता - वासनवाडी, ता.जि.बीड | 1) 04/04/2025 2) 15/04/2025 3) 29/04/2025 | दि. 31/01/2025 रोजी रु. 29,798 /- व दि.01/02/2025 पासुनचे व्याज व अतिरिक्त खर्च | - | मुख्य शाखा, बीड / कर्ज खाते क्र 194/2000005 |
| 3 | **श्री कथले सुधाकर अर्जुन** पत्ता - सौंदाना, पोस्ट - कामखेडा ता.जि.बीड | 1.**श्री जगताप बप्पासाहेब विनायक** पत्ता - मुरशदपुर, ता.जि.बीड 2.**श्री माळी शिवाजी सखाराम** पत्ता - सौंदाना, पोस्ट - कामखेडा ता.जि.बीड | 1) 04/04/2025 2) 15/04/2025 3) 29/04/2025 | दि. 31/01/2025 रोजी रु. 36,410 /- व दि.01/02/2025 पासुनचे व्याज व अतिरिक्त खर्च | लि.दे. कर्जदार यांच्या नावावरील मौजे- सौंदाना ग्रां.प. मालमत्ता क्र.207 | मुख्य शाखा, बीड / कर्ज खाते क्र 193/2000003 |

ठिकाण - बीड
दिनांक - 15/04/2025

**स्वाक्षरित**
**उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड**

# महात्मा फुले कृषी विद्यापीठात उद्या पदवीप्रदान समारंभ

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांची उपस्थिती

राहुरी : राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात मंगळवारी (दि.२२) विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयासमोरील प्रांगणात होणार आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती असेल. या समारंभात विविध विभागातील ५ हजार १८२ विद्यार्थ्यांना पदवीप्रदान केली जाणार आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या अकाली निधनामुळे यंदाचा पदवीदान समारंभ काही दिवसासाठी स्थगित करावा लागला होता. आता हा सोहळा मंगळवारी (दि.२२) होत आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन असतील. कृषिमंत्री तथा कृषी विद्यापीठाचे प्रतिकुलपती अॅड.




माणिकराव कोकाटे, जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे) मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, कृषी राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, कृषी परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख विद्यापीठ कार्यकारी आणि विद्या परिषदेचे सदस्य यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या वेळी नवी दिल्ली येथील कृषी शिक्षण व संशोधन विभागाअंतर्गत असलेल्या कृषी वैज्ञानिक निवड मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय कुमार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असतील. या पदवीदान समारंभात गेल्या वर्षातील विविध विद्याशाखांतील एकूण ५,१८२ विद्यार्थ्यांना पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवीने कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्याद्वारे अनुग्रहित करण्यात येणार आहेत. त्यात विविध विद्याशाखातील ४८१२ विद्यार्थी पदवी, ३३० विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी तर ४० विद्यार्थ्यांना आचार्य पदवीने गौरवले जाईल. या वेळी वेगवेगळ्या विभागात नैपुण्य मिळवलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सुवर्ण पदके आणि रोख पारितोषिके प्रदान करून गौरविण्यात येणार असल्याचे विद्यापीठातून सांगण्यात आले.

## उन्हाळी हंगामात नागरमोथा, हाराळी आणि कुदा या तणांचे नियंत्रण



शेतीतील तण नियंत्रण, विशेषत: उन्हाळी हंगामात, एक अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. विविध प्रकारच्या तणांनी पिकांच्या वाढीला अडथळा आणला, उत्पादनावर परिणाम केला आणि शेतीच्या खर्चातही वाढ केली. यामध्ये नागरमोथा, हाराळी आणि कुदा यांचे नियंत्रण कसे करावे याची माहिती घेतल्यास अडचणी येत नाहीत.

उन्हाळी हंगामात तण नियंत्रणाची सुरवात कशी करावी?

उन्हाळ्याच्या हंगामात, अनेक शेतकऱ्यांना वेगवेगळ्या प्रकारची तणे त्यांच्या शेतांमध्ये दिसतात. विशेषत: तणांची वाढ या हंगामात अधिक होऊ शकते कारण पाणी कमी असल्यामुळे जमीन हलकी होते आणि तण अधिक प्रमाणात उगवतात. अशा परिस्थितीत एक महत्वपूर्ण उपाय म्हणजे, शेतातील जमीन चांगली नागरून वखरून घेणे. वखरलेली आणि गाठलेली जमिन जाळा: शेतातील गाठी आणि काशा वेचून त्यांना जाळून टाकणे हे तणांच्या संख्येला कमी करण्याचा एक प्रभावी उपाय आहे. यामुळे तणाच्या मुळांवरही नियंत्रण मिळवता येते, तसेच त्यांच्या वाढीस अडथळा निर्माण होतो.

तणनाशकांचा वापर : नागरमोथा, हाराळी आणि कुदा या तणांचा प्रभावी नियंत्रणासाठी तणनाशकांचा वापर करणे अत्यंत फायदेशीर ठरू शकतो. त्यासाठी ग्लायफॉसेट हा तणनाशक खूप प्रभावी आहे. हे तणनाशक प्रामुख्याने कोवळ्या तणांवर प्रभावी असते, विशेषतः ते २ ते ४ पानांच्या अवस्थेत असताना.

ग्लायफॉसेट वापराची शिफारस : ग्लायफॉसेट तणनाशक हेक्टरी २. किलो प्रमाणात फवारावे. यासाठी बाजारात विविध ब्रॅण्ड्स उपलब्ध आहेत, जसे की ग्लायसेल, राऊंडअप, विडॉफ इत्यादी. फवारणीचे योग्य वेळापत्रक: तणनाशक फवारल्यानंतर, कमीत कमी दोन तास पाऊस पडणार नाही, याची काळजी घ्या. यामुळे तणनाशक पिकात चांगले शोषले जाते आणि अधिक प्रभावीपणे कार्य करते.

तणनाशक फवारणीनंतर काय काळजी घ्यावी : ग्लायफॉसेट फवारल्यानंतर, पुढील काही आठवडे शेतामध्ये कोणतीही मशागत करणे टाळा. यामुळे तणनाशकाचा प्रभाव टिकतो आणि तणाचे नियंत्रण अधिक प्रभावी होते. फवारणी केल्यावर ३ ते ४ आठवडे काहीही मशागत करणे टाळल्यास, तणांच्या मुळांची पूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता जास्त असते.

तणांचे नियंत्रण करण्यासाठी काही पर्यायी उपाय : जवळजवळ झाडींचे नियंत्रण: काही ठिकाणी झाडे आणि विविध वनस्पतींनी तणांचा वाढ थांबवता येतो. त्या व्यतिरिक्त, तणांचे नियंत्रण जैविक पद्धतीने देखील करू शकता. कंपोस्ट किंवा जैविक खतांचा वापर जास्त केल्यास तणांच्या वाढीस अडथळा आणू शकतो. पिकाच्या वाफ्यावर तणांची निवड: विविध पीकांच्या वाफ्यावर विविध तणांचा प्रकोप असतो. त्यामुळे त्या पिकानुसार तणांच्या नियंत्रण योजनेची तयारी करणे आवश्यक आहे.निष्कर्ष : तण नियंत्रणासाठी योग्य तंत्रांचा अवलंब करणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. खासकरून उन्हाळी हंगामात, योग्य वेळेत वखर करणे आणि तणनाशकांचा वापर हा एक प्रभावी उपाय ठरू शकतो. तसेच, फवारणी नंतर काही आठवडे मशागत टाळणे तणाच्या नियंत्रणामध्ये मदत करेल. शेतीत तणांचा योग्य नियंत्रण पद्धतीने करणे हे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

## केओलिन वापरल्यास कमी पाण्यात पिके जगविणे सोपे

वाढत्या उन्हामुळे पिकाची पाण्याची गरज वाढते. पिकाची पाण्याची गरज कमी करण्यासाठी किंवा कमी पाण्यातही पिकाने तग धरुन राहावे यासाठी शेतकरी बरेच उपाय करतात. पण बऱ्याच शेतकऱ्यांना बाष्परोधकाचा वापर करुन कमी पाण्यात ही पीक जगवता येत हेच माहीत नाही.

सुरुवातीला बाष्परोधक म्हणजे काय?

बाष्पीभवनामुळे जस जमिनितून पाणी वाफ स्वरुपात निघून जात त्याप्रमाणेच बाष्पोत्सर्जनामुळे पिकाच्या पानांतून पाणी निघून जात असत. कडक उन्हामुळे तर बाष्पोत्सर्जनाच प्रमाण खुप वाढते. त्यामुळे झाडे सुकतात आणि पिकाची पाण्याची गरज वाढते. ड्रॅगनफ्रूट, द्राक्ष, डाळिंब, आंबा, संत्री आणि कलिंगड या सारख्या फळांवर काळे डाग पडतात. यालाच सनबर्न असेही म्हणतात. याशिवाय पाने करपणे, पिकाची वाढ खुंटणे, अन्नद्रव्यांचा पुरवठा कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात. असे नुकसान होऊ द्यायचेनसेल आणि झाडातील पाणी टिकवून ठेवायचे असेल तर बाष्परोधकाचा वापर करतात.

बाष्परोधक कस काम करते : बाष्परोधक हे पावडर स्वरुपात असते. ते विशिष्ट प्रमाणात पाण्यात मिसळून वापरल जाते. बाष्परोधकाची जर फवारणी केली तर पानांवर बाष्परोधकाचा पांढरा थर जमा होतो. हा पांढऱ्या रंगाचा थर प्रखर सूर्यकिरणे पानांत किंवा फळांत जाऊ न देता तो वातावरणात परावर्तित करतो. त्यामुळे पानांतील पेशीद्रवाचे तापमान बाहेरील वातावरणातील तापमानापेक्षा ३ ते ४ अंश सेल्सिअसने कमी राहण्यास मदत होते. पानांमधून होणारे बाष्पोत्सर्जन २५ ते ३० टक्क्यांनी कमी होते. त्यामुळे कमी पाण्यातही पीक तग धरते.

कोणत बाष्परोधक चांगले : बाजारात विविध प्रकाराचे बाष्परोधक उपलब्ध आहेत त्यापैकी केओलिन हे बाष्परोधक जास्त परिणामकारक आहे. वजनाने हलक्या असलेल्या विशिष्ट दगडापासून हे केओलिन तयार करतात. बाजारात उपलब्ध असलेले कच्चे केओलिन हे पिकांना हानिकारक ठरते. कारण यामध्ये लीड, अर्सेनिक यासारखे विषारी घटक असतात. या केओलीनवर प्रक्रिया करुन ते शुद्ध केले जाते. हे केओलिन जनावरांच्या औषधात, पशुखाद्यातही वापरल जाते. केओलिनचा वापर केल्यानंतर पानांवर एक विशिष्ट प्रकारचा थर तयार होतो. हा थर पानाच्या आतील पेशी भोवती संरक्षक कवच म्हणून कार्य करते. त्यामुळे अनेक रसशोषक किडी आणि रोगाना प्रतिबंध होतो. त्यामुळे पिकांचे रोग व किडींपासूनही संरक्षण होते.

केओलिनचा वापर कसा करावा? केओलिनचा वापर हा फवारणीद्वारे केला जातो.

फवारणीसाठी ५ ते १० ग्रॅम केओलिन एक लिटर पाण्यात मिसळून फवारावे. उन्हाळ्यात कमीत कमी १० ते १५ दिवसांच्या अंतराने केओलिनची फवारणी करावी. म्हणजे पाणी कमी असेल तर पीक तग धरुन राहील. तुमच्याकडे जर पाणी कमी असेल आणि फळबाग असेल तर केओलीनचा वापर करुन बघा.



## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय नागरी सेवा दिन

### महत्वाच्या घटना

७५३ : रोम्युलस यांनी रोम स्थापन केले. (पारंपारिक तारीख)

१५२६ : मुघल साम्राज्याचे शासक सम्राट अकबर व सुलतान इब्राहिम लोदी यांच्यात पानिपतचे पहिले युद्ध होऊन त्यांत सुलतान इब्राहिम लोदी यांच्या पराभवानंतर दिल्ली येथील सुलतान शाहीचा अंत झाला.

१६६९ : छत्रपती शिवाजी महाराज यांनी समर्थ रामदास स्वामी यांची भेट घेतली.

१७२० : पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ भट्ट यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र थोरले बाजीराव पेशवे हे मराठा साम्राज्याचे उत्तराधिकारी बनले

१९३२ : नाशिकच्या काळाराम मंदिराचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवण्याचा आदेश देण्यात आला.

१९४१ : दुसऱ्या महायुद्धा दरम्यान ग्रीस देश जर्मनी देशाला शरण गेला.

१९६० : रिओ दि जानेरो ह्या ब्राझील देशाच्या राजधानीचे उद्घाटन झाले.

१९७२ : 'अपोलो १६' या अमेरिकन अंतराळयानातुन गेलेले जॉन यंग आणि चार्ल्स ड्युक हे अंतराळवीर चंद्रावर उतरले.

१९९६ : भारतीय वायू सेनेचे अधिकारी संजय थापर पॅराशूटच्या साह्याने उत्तर ध्रुवावर उतरले.

१९९७ : भारताचे १२ वे पंतप्रधान म्हणून डॉ. इंद्रकुमार गुजराल (वय ७८ वर्षे) यांनी सूत्रे हाती घेतली. गुजराल हे वयाने ज्येष्ठ असलेले दुसर्या क्रमांकाचे पंतप्रधान आहेत. याआधी मोरारजी देसाई यांनी ८१ व्या वर्षी पंतप्रधानपदाची सूत्र हाती घेतली होती.

२००० : आई वडिलांच्या संपत्तीत परावलंबी विधवेलाही अधिकार असल्याचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला.

२००७ : वेस्ट इंडीज देशातील क्रिकेट संघाचे महान क्रिकेटपटू ब्रायन लारा यांनी एकदिवसीय क्रिकेट खेळातून निवृत्ती घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६४ : मॅक्स वेबर जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ (मृत्यू: १४ जून १९२०)

१९०९ : ज.द. गोंधळेकर (जनार्दन दत्तात्रय गोंधळेकर), मराठी चित्रकार.

१९२२ : ॲलिएस्टर मॅकलिन स्कॉटिश साहसकथा लेखक (मृत्यू: २ फेब्रुवारी १९८७)

१९२६ : एलिझाबेथ (दुसरी) इंग्लंडची राणी. प्रदीर्घ कारकिर्दीच्या बाबतीत राणी व्हिक्टोरिया खालोखाल राणी एलिझाबेथचा दुसरा क्रमांक लागतो.

१९३४ : डॉ. गुंथर सोन्थायमर महाराष्ट्र लोकधर्म व मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक

१९४५ : भारतीय क्रिकेटपटू आणि अंपायर श्रीनिवासराघवन वेंकटराघवन यांचा जन्म.

१९५० : शिवाजी साटम अभिनेते

१९५० : भारतातील प्राख्यात किराणा घराण्यातील हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे गायक पंडित उपेंद्र भट यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५०९ : हेन्री (सातवा) इंग्लंडचा राजा (जन्म: २८ जानेवारी १४५७)

१९१० : मार्क ट्वेन विख्यात अमेरिकन विनोदकार आणि कादंबरीकार (जन्म: ३० नोव्हेंबर १८३५)

१९३८ : सर मुहम्मद इक्बाल पाकिस्तानी कवी, तत्त्वज्ञ आणि राजकीय नेते (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७)

१९४६ : जॉन मायनार्ड केन्स ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ (जन्म: ५ जून १८८३)

१९५२ : सर स्टॅफोर्ड क्रिप्स इंग्लिश राजकारणी (जन्म: २४ एप्रिल १८८९)

१९६४ : द्रविड चळवळीला चालना देणारे महान भारतीय तमिळ कवी भारतीदासन यांचे निधन.

२०१३ : शकुंतलादेवी गणितज्ञ, ज्योतिर्विद आणि अतिवेगाने आकडेमोड करणारी भारतीय महिला (जन्म: ४ नोव्हेंबर १९२९)

## तणनाशक फवारणी करताना अशी घ्या काळजी



खरीप हंगामातील पेरण्या काही दिवसांनी सुरू होतील. त्यानंतर आंतर मशागतीचे काम सुरू असेल. यापैकी तणनियंत्रण किंवा तणनाशक फवारणी हे महत्त्वाचे कार्य आहे. अनेकजण चुकीच्या पद्धतीने तणनाशकाची फवारणी करत असल्याने त्याचा फायदा होण्यापेक्षा नुकसानच होताना दिसत आहे. जाणून घेऊ या तणनाशक फवारणीसाठी लक्षात ठेवण्याच्या महत्त्वाच्या बाबी.

शेतकरी तणनाशकाची फवारणी कशासाठी : ग्रामीण भागात शेतात निंदण कामासाठी मजूरांचा फार मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला आहे. पूर्वीसारखे शेतमजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकरी तणनाशक फवारणीकडे वळले आहेत. यामुळे कमी वेळात आणि कमी खर्चात तणनियंत्रण होते.

वेगवेगळ्या पिकातील तण आणि उपयुक्त तणनाशके : सूचीपर्णी पिकांसाठी – गहू, भात, ऊस, ज्वारी, आदी पिकांमध्ये २–४ डी हे हार्मोनवर्धक तणनाशक फवारले जाते. चपट्या पानांच्या पिकांसाठी – कापूस पिकांतील तणनाशक फवारण्यासाठी पेंडीमेथैलिन याची फवारणी केली जाते.सर्व प्रकारच्या तणांच्या समूळ उच्चाटनासाठी – सर्व प्रकारच्या तणांच्या नियंत्रणासाठी जेव्हा पीक उभे नसेल तेव्हाच राउंडअप फवारणी केली जाते.तणनाशक फवारणीसाठी महत्त्वाच्या बाबी : जमिनीत ओलावा असताना तणनाशकाची फवारणी केल्यास ते अधिक फायदेशीर ठरत असल्याचे तज्ज्ञांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे जमिनीत चांगला ओलावा निर्माण झाला व थोडीशी उघडीप मिळताच शेतकर्यांनी तणनाशक फवारणी करावी. काही शेतकरी कोरड्यावरच फवारणी करीत आहेत; अशा कोरड्या जमिनीत तणनाशक फवारणी टाळावी.

तण कोवळे असताना तणनाशक फवारल्यास ते त्यावर मारक ठरते. कोवळे तण लवकर मरते. शक्यतो जमिनीत ओलावा असतानाच तणनाशकांची फवारणी करावी, तणनाशक फवारणीनंतर जमिनीला पाणी देऊ नये अन्यथा तणनाशकाचा पाहिजे तेवढा परिणाम होणार नाही. तणनाशक फवारणी केलेली टाकी तसेच फवारणी पंप लगेच दुसर्या पिकांवर फवारणीसाठी उपयोगात आणू नये. तो पंप स्वच्छ, गरम पाण्याने साफ करूनच त्याचा वापर करावा. बाजारात अनेक प्रकारची तणनाशके उपलब्ध आहेत. पिकांमध्ये कोणत्या प्रकारचे तण अधिक आहे, त्यानुसार तणनाशक खरेदी करावे. चुकीचे तणनाशक फवारणी केल्यास पिकांना याचा फटका बसतो.

जमिनीची गुणवत्ता आणि प्रकार बघूनच तणनाशक फवारणी करावे. अनेकदा हलक्या जमिनीत घातक तणनाशक फवारणी केल्यास याचा पिकांच्या उत्पादनासह जमिनीच्या गुणवत्तेवर परिणाम होतो. तणनाशक फवारणी करताना जमिनीत ओलावा असावा, वातावरण चांगले असावे, स्वच्छ पाणी, स्वच्छ पंप, कीटकनाशकापासून तणनाशक दूर ठेवणे, आदी काळजी घ्यावी लागते.

## थोडक्यात

### बुक ऑफ द इयर पुरस्कार पाचरट कादंबरीला प्रदान



पिंपळवंडी । प्रतिनिधी

वाफेगांव (ता.माळशिरस) येथे संभाजी दिगंबर सरवदे लिखित " वावटळ "या कादंबरीचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या प्रकाशन निमित्त अशोक नजान लिखित 'पाचरट' या ऊसतोड मजुरावरील कादंबरीला समीक्षा पब्लिकेशन पंढरपूरचा मानाचा 'बुक ऑफ द इयर ' हा पुरस्कार सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते,तसेच प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा कु.स्वरूपाराणी मोहिते-पाटील,डॉ.शिवाजी शिंदे,सुप्रसिद्ध कवी व सहाय्यक कुलसचिव,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर,साहित्यिक डॉ.ज्ञानेश्वर जाधवर (बार्शी), समीक्षा पब्लिकेशन्सचे प्रकाशक प्रविण भाकरे (पंढरपूर), साहित्यिक संभाजी सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते.पुरस्कार प्राप्त नजान सरांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

### राज्यात महिलांना संरक्षण आहे का नाही?-स्वाती कातखडे

पाटोदा। प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील सत्र न्यायालयात वकिली करणाऱ्या एका महिला वकीलावर, गावातील सरपंच आणि त्याच्या कार्यकर्त्यांनी शेतामध्ये रिंगण करून काठ्या व जे.सी.बी. पाईपने अमानुष मारहाण केली. मुख्यमंत्र्यांनी "लाडकी बहीण" योजना आणली पण राज्यात महिला सुरक्षित आहेत का असा मोठा प्रश्न उपस्थित होत असून या घटनेमुळे संतापाची लाट उसळली आहे अशी प्रतिक्रिया स्वाती कातखडे (जिल्हाध्यक्षा, सावता सेना महिला आघाडी) यांनी संतप्त प्रतिक्रिया देत सांगितले की,"जर मुख्यमंत्र्यांची लाडकी बहिण सुरक्षित नाही, तर राज्यातील इतर परिस्थितीचं काय ? हे सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. आम्ही याचा तीव्र निषेध करतो. मुख्यमंत्र्यांनी गृहमंत्री पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा.दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावे पीडितेला न्याय मिळवून द्यावा गृहमंत्री पदाचा नैतिकतेच्या आधारे राजीनामा घ्यावा महिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र तपास यंत्रणा स्थापन करण्यात यावी जर सरकारने यावर तातडीने कारवाई केली नाही, तर सावता सेना महिला आघाडी जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही स्वाती कातखडे जिल्हाध्यक्षा, सावता सेना महिला आघाडी यांनी दिला आहे

### पिंपळवंडी केंद्राची शिक्षण परिषद

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पिंपळवंडी केंद्राचा अनोखा उपक्रम पिंक बुथ प्रमाणे पिंक शिक्षणपरिषद घेत घातला एक आदर्श दि.१७/०४/२०२५ रोजी पिंपळवंडी केंद्राची शिक्षण परिषद जि.प.प्रा.शा आंबेवाडी येथे केंद्राचे आदर्श केंद्रप्रमुख आणि पिंक शिक्षण परिषदेचे संकल्पक आदरणीय नरसाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली होती.शिक्षणपरिषदेचे अध्यक्ष नरसाळे सर,प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी सुळे साहेब,केंद्रीय मुख्याध्यापक येवले सर,राष्ट्रपती प्राप्त शिक्षक संदीप पवार सर,सुळे सर होते.शिक्षण परिषदेचे सर्व नियोजन महिला शिक्षिकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने करण्यात आले होते.अगदी सूत्रसंचालनापासून ते आभार प्रदर्शनापर्यंत सर्व जबाबदारी महिलांनी एक आदर्श घालून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी पटवा मॅडम यांनी तर शिक्षणपरिषदेसाठी सुलभक साधन व्यक्ती म्हणून श्रीमती सुषमा क्षीरसागर मॅडम,श्रीमती पोटभरे, मॅडम,श्रीमती जगताप मॅडम,समृद्धी पटवा मॅडम,श्रीमती कुर्ले मॅडम, श्रीमती घोडके मॅडम या सर्व महिलांनी उत्तम पद्धतीने आपले विषय अभ्यासपूर्णरित्या मांडले.

### पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन

बीड। प्रतिनिधी

२० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सिहोर येथील पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन दि. ७ ते १४ जून २०२५ या कालावधीत श्री क्षेत्र चाकरवाडी येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी गुरूवार दि. २४ एप्रिल रोजी रविराज मंगल कार्यालय, एमआयडीसी रोड,बीड येथे सायंकाळी ५ वाजता शहरातील डॉक्टरांची व्यापक बैठक महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.शिवपुराण कथेच्या नियोजनासाठी आणि विविध समित्यांचे गठण करण्यासाठी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व डॉक्टरांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये सर्वांच्या सहकार्याने पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवपुराण कथेचे नियोजन करण्यात येणार असून हा कार्यक्रम भव्य दिव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शहरातील सर्व डॉक्टर मंडळींनी या बैठकीस मोठ्या संख्येने सहभागी होवून हे कार्य सिद्धीस नेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन शिवपुराण कथा आयोजन समिती आणि महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठवाड्याच्या महत्वाच्या प्रश्नांसाठी पुढचा राजकिय प्रवास -जयदत्त क्षीरसागर

राजुरी। प्रतिनिधी

संपत्ती कमावण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा, आजची मुले ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. मराठवाडा ही संतांची भुमी आहे. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले. तर जरूड ते सिरसाळा आणि शिरापूर फाटा ते सौताडा या दोन रस्त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असून तो मंजूर झाला आहे. त्याची निविदा प्रक्रिया होऊन हा रस्ता देखील पूर्ण होणार असून या रस्त्यामुळे दळणवळण सुविधा सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



माजी जि.प.सदस्य स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त नवगण राजुरी येथे पंचदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. नारायण महाराज डिसले, मकरंद महाराज, रविंद्र क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ.विठ्ठल क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर,संपादक विजयराज बंब, अजित वरपे, बळीराम गवते, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

काल्याच्या किर्तनासाठी महंत शिवाजी महाराजांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला. किर्तन सांगताना महाराज पुढे म्हणाले की, आई या शब्दात मोठी ताकत आहे, आई हा व्यापक शब्द आहे, लाख गुन्हे माफ करणारे न्यायालय म्हणजे आई आहे. निस्वार्थीपणे मुलांवर प्रेम करणारी आई आहे. चांगली मुले जन्मण्यासाठी आई-वडीलांची सुध्दा पुण्याई असावी लागते. शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी आई-वडीलांच्या पुण्याईने भगवंत रत्न जन्माला येतात. आई तुझे थोर उपकार असे कविने म्हटले आहे. आई माझी मायेचा सागर आहे. लाभाविना प्रेम करणारी आई आहे, स्व.रेखाताईंनी राम नामाचा जप केला, अनंत कोटी पुण्य घडलेले आहे. रेखाताईंनी उत्तम किर्ती केलेली आहे ज्यांनी उत्तम किर्ती केली त्यांचे असे सोहळे साजरे होतात. भक्तीच्या मंडपामध्ये काय करायचे आणि काय करायचे नाही हे शिकायचे आहे. जसे कर्म केले तसे फळ मिळते जसं पेराल तसं उगवतं भगवान स्वतःहून भक्ताकडे जातो अशी भक्ताची भक्ती असावी. आपल्यावर राज आल्यावर राज दिलच पाहिजे असे सांगून आत्महत्या करू नका आलेल्या संकटाला सामोरं गेलं पाहिजे स्त्री-भ्रूण हत्या करू नका. सर्वांनी एकत्र येऊन केलेली क्रिया याला काला म्हणतात असे त्यांनी सांगितले.यावेळी पुढे बोलातना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, भविष्याचा विचार करून मराठवाड्याच्या पाणी प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा गरजेचा आहे, समुद्राला वाहून जाणारे पाणी हे जर आपल्याला उपलब्ध झाले तर पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, पुढच्या पिढीसाठी आतापासून विचार करून प्रश्नांची सोडवणूक महत्वाची आहे, आगामी काळात अशाच प्रश्नासाठी पुढचा प्रवास करावा लागणार आहे. अध्यात्मातील राजुरीचे वैभव महंत अमृत महाराज आहेत. स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी स्व.काकू-नाना पासून पोकळी निर्माण झाली आहे. नियती कोणाला सोडत नाही. अध्यात्मिक क्षेत्रात स्व.रेखानी काम केले. रेखा आमच्या परिवारातील एक सदस्य होती. नवगण राजुरी आणि या भागात गणपतीचे आशिर्वाद आहेत जसे महाराष्ट्रात अष्टविनायक तसेच महात्म्य या परिसरात आहे. देवांचा दैत्यांवर विजय झाला असं त्या काळातल्या कथा आहेत. संघर्ष हा प्रत्येकाच्या जीवनात आहे भौतिक सुखासाठी माणूस झगडत असतो. या महिन्यात ठिकठिकाणी नारळी सप्ताह, वार्षिक सप्ताह होत आहेत त्यामुळे भक्तीचा महापूर आला आहे. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांनी जाती तोडा समाज जोडा मन, माणूसकी जपा असे सांगून अध्यात्माचा संदेश दिला आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.अरूण भस्मे, रामदास हांगे, आसाराम औसरमल, सुनिल पांगारकर, ॲड.बालाप्रसाद करवा, संजय मचाले, अशोक रोमण, सुर्यकांत रायते, तानाजी आगळे, संजय कुलकर्णी, जीवन जोगदंड, प्रा.आबासाहेब हांगे यांच्यासह भाविक-भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त जय भवानी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

पाटोदा। प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मोत्सवानिमित्त जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शासनाने विविध कार्यक्रम आयोजित करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार कला व विज्ञान महाविद्यालयाच्या मराठी विभाग व सांस्कृतिक विभागाच्या संयुक्तपणे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन - कार्या विषयीच्या या वक्तृत्व स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला.




या स्पर्धेत कु. कल्याणी तांबे ही विद्यार्थीनी सर्वप्रथम ठरली तर कु. प्रज्ञा ओव्हाळ ही द्वितीय, कु. माधुरी केकाण ही तृतीय आणि कु. सानिका दहिफळे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. सर्व विजेत्यांना रोख रक्कमेच्या स्वरूपात पारितोषिके प्रदान करण्यात आली.याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे, स्पर्धा संयोजक मराठी विभागाचे प्रा. बापू घोक्षे आणि प्रोफेसर डॉ. रामकृष्ण प्रधान यांची प्रमुख उपस्थिती होती. या वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. वंदन जाधव, प्रा. डॉ. प्रविण शिलेदार व प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी काम बघितले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनावरून मराठी विभाग व सांस्कृतिक विभागाचे सर्व प्राध्यापक आणि कुणाल काळे, दत्ता चादर आदींनी परिश्रम घेतले.

## मुख्यमंत्र्यांच्या हेलिपॅडसाठी झाडांची कत्तल निषेधार्ह -डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण मराठवाड्यात बीड जिल्ह्यात २.४ ईतके कमी वनक्षेत्र असुन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे.वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत " झाडे लावा आणि झाडे जगवा" मोठ्या प्रमाणावर जाहिरात बाजी करण्यात येते. मात्र आज दि.१९ शनिवार रोजी शिरूर कासार तालुक्यातील घाटशिळ पारगाव येथे वैराग्यमुर्ती संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ वा नारळी सप्ताह सांगता निमित्ताने समारोप प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे हेलिकॉप्टरने आगमन झाले.यावेळी हेलिपॅड तयार करण्यासाठी १५-२० वर्षांपूर्वीची लहानमोठी १६ झाडांची कत्तल करण्यात आली. याबद्दल वृक्षप्रेमी आणि पर्यावरण प्रेमीमध्ये संतापाची लाट उसळली असुन " झाडे जगवा आणि झाडे लावा" असा लाखों रूपयांच्या जाहिरातीद्वारे संदेश देणा-या सरकारला हेलिपॅडची जागा बदलुन झाडे वाचवता आली



नसती का?? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असुन एरवी वृक्षतोडीसाठी सर्वसामान्य माणसाला दंडाची भाषा करणारे सरकार, लोकप्रतिनिधींसाठी वेगळे नियम आणि कायदे आहेत का?? या वृक्षतोडीसाठी वनविभागाकडून रितसर परवानगी घेण्यात आली होती का?? असा सवाल करत संबंधित प्रकरणात चौकशी करून झाडे तोडणा-या जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## तहसीलदार खोमणेकडून नियमाची पायमल्ली;

### नवीन वाहनावर नंबर न टाकताच वापर

बीड । प्रतिनिधी

गेवराई चे तहसीलदार संजय खोमणे हे शासकीय नियमाची पायमल्ली करत असल्याचे दिसून आले आहे. तहसील कार्यासाठी आलेल्या नवीन विना नंबर असलेल्या वाहनांमध्ये बसून ते तालुका व जिल्हास्तरावर प्रवास करीत आहेत. तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी हे शासकीय नियमाचा भंग करीत असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.




यासंदर्भात माहिती अशी की, गेल्या काही दिवसापूर्वी गेवराई तहसील कार्यालयाला तहसीलदार यांच्यासाठी नवीन वाहन शासनाने मंजूर केले आहे सदर वाहन शोरूम मधून काढल्यानंतर नंबर प्लेट टाकल्यानंतरच कोणतेही वाहन रोडवर आणले जाते, असा परिवहन खात्याचा नियम आहे. मात्र गेल्या काही दिवसापासून बीडचे तहसीलदार संजय खोमणे हे नंबर नसलेल्या वाहनांमधून स्वतः तालुक्यात सर्वत्र राजरोसपणे फिरत आहेत. गेवराई तालुका दंडाधिकारी असलेल्या खोमणे तहसीलदार यांच्याकडून शासनाच्या परिवहन खात्याच्या नियमाची पायमल्ली होत असल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघाने पटकावला

### सोळंके महाविद्यालयाचा संघ सलग दुसऱ्या वर्षी चषकाचा मानकरी

माजलगाव। प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या प्राध्यापक संघाने क्वॉलिटी संघाचा पराभव करून सलग दुसऱ्या वर्षी युगप्रवर्तक चषक पटकावला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी युगप्रवर्तक क्रिकेट चषकाचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामना सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्वॉलिटी संघात झाला. अंतिम सामन्यात क्वॉलिटी संघाने विजयासाठी ८२ धावाचे लक्ष दिले होते. सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संघाने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत क्वालिटी संघाचा ९ गाड्यांनी दणदणीत पराभव केला. सुंदरराव सोळंके महाविद्द्यालयाच्या प्रा. रोहित शेठे यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत स्पर्धेत तीन वेळा अर्धशतक ठोकले. त्यांना मॅन ऑफ द सिरीज देण्यात आला. बेस्ट बॅस्ट्मन म्हणून



प्रा. सिद्धू कदम यांना तर बेस्ट बॉलर म्हणून कर्णधार प्रा. अमोल गायकवाड यांना पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेचे पारितोषिक वितरण पो. नि.राहुल सुर्यतळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रमेश फपाळ, कास्ट्राईबचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार, भारत टाकणखार, वसंत टाकणखार, पीएसआय माकने,इम्रान नाईक, मुख्याध्यापक अभिमन्यू इबीते, शिवाजी भाळशंकर, राहुल खुणे, नितीन पुट्टेवाड,किरण शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती. युगप्रवर्तक चषक जिंकल्याबद्दल संघातील खेळाडू कर्णधार प्रा.अमोल गायकवाड, प्रा रोहित शेटे, , प्रा. अरुण पेंटावार , प्रा.सुदर्शन स्वामी , प्रा.सिद्धेश्वर कदम, प्रा. स्वप्नील टाक, प्रा.महेंद्र वानखेडे, प्रा.प्रविण कोरडे, प्रा.ममताराम येवले, रामदास इसानकर,हितेंद्र काळे, प्रा.कार्तिक पाचलेगावकर,प्रा.एकनाथ शेंडगे,प्रा. इम्रान पठाण यांचे म. शि.प्र. मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाशदादा सोळंके यांच्यासह ॲड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ. जी.के.सानप, उपप्राचार्य डॉ. एन.के.मुळे, उपप्राचार्य एम.ए.कव्हळे, प्रबंधक प्रशांत चव्हाण ,अधीक्षक सतीश एरंडे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.


**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती पी डी चव्हाण २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ६५०/२०२५**

**ॲड. एम आर गर्जे**

**संगिता भ्र भैय्यासाहेब घुगे व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार :-१. संगिता भ्र भैय्यासाहेब घुगे, वय-२०, वर्षे, धंदा-घरकाम, रा. गुंजाळा पो. आडगांव, ता. जि. बीड २. कार्तिकी पि भैय्यासाहेब घुगे, वय-६ महिने, अपाक आई अर्जदार क १ रा.सदर ३. गयाबाई भ्र. दिनकर घुगे, वय-४४, वर्षे, धंदा-घरकाम, रा. सदर ४. दिनकर पि. शामराव घुगे, वय ४८, वर्षे, धंदा-शेती, रा. सदर (अर्जदार हे भारतीय आहेत)

विरुध्द निरंक

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत भैय्यासाहेब पि. दिनकर घुगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत भैय्यासाहेब पि. दिनकर घुगे यांचा मृत्यु दिनांक २४.११.२०२४ रोजी रा. गुजांळा, पो. आडगांव ता. जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क २ ही मयताची अज्ञान मुलगी आहे. अर्जदार क ३ व ४ हे मयताचे आई वडील आहेत. हे मयताचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत भैय्यासाहेब पि. दिनकर घुगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १९ एप्रिल २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १३ जुन २०२५.**

स्वाक्षरित **क लिपीक** | शिक्का | आदेशावरून स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड



**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती टी. ए. आसरकर. ३.रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ६३६/२०२५**

**ॲड. एस. आर. राजपूत**

**निता विरुध्द निरंक**

अर्जदार १) नीता मुरलीधर तोडकर, वय ४५ वर्ष धंदा घरकाम रा. हिंगणी बु.. ता. जि. बीड

विरुध्द मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत मुरलीधर भिकाराम तोडकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत मुरलीधर भिकाराम तोडकर यांचा मृत्यु दि. १२/०१/२०२३ रोजी हिंगणी बु.. ता.जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार ही मयताची. एकुलती एक मुलगी आहे. अर्जदारास आणखी भाउ अथवा बहिण नाही तसेच अर्जदाराचे आई वडील फार वर्षापुर्वीच मयत झाले आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारले प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सेदरहु-मंयेताचे वारस नव्हेत असे कोणाल, समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन - एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की. जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहू अर्जदार... हक्चद्दल लागलीय पुरावा घेवुन, ज्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत मुरलीधर भिकाराम तोडकर यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.आज दिनांक १६ माहे एप्रिल २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख १३ जून २०२५**

स्वाक्षरित **क लिपीक** | शिक्का | आदेशावरून स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड



**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ५४८/२०२५**

**ॲड. ठोसर ए.एस.**

**गंगुबाई विरुध्द निरंक**

अर्जदार :-१) गंगुबाई भ्र. किसन जाधव वय ७० वर्षे धंदा घरकाम २) भिमराव पि. किसन जाधव वय ४७ वर्षे धंदा शेती ३) बाबासाहेब पि. किसन जाधव वय ४५ वर्षे धंदा शेती ४) गयाबाई भ्र. सातेराम काजळे वय ४९ वर्षे धंदा घरकाम सर्व रा. कोल्हारवाडी ता. जि.बीड

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate मिळणे बाबत.. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे किसन पि. माणिक जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत नामे किसन पि. माणिक जाधव रा. कोल्हारवाडी ता.जि.बीड यांचा मृत्यु दिनांक : १२.०४. २०२२ रोजी मौजे कोल्हारवाडी ता.जि.बीड येथे राहते घरी झाला. अर्जदार क १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत तर अर्जदार क ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई वडील यापूर्वीच मयत झालेले आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय ईतर कुणीही वारस नाही. वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत किसन पि. माणिक जाधव यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **आज दिनांक ०२/०४/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक ०३/०५/२०२५**

स्वाक्षरित **क लिपीक** | शिक्का | आदेशावरून स्वाक्षरित **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


## शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत गोठा भस्मसात



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वाघिरा येथील रहिवासी बापुराव नरहरी आजबे यांचे लिंबागणेश येथील काळवाडी शिवारात गट नंबर २८० मध्ये शेतीजमिन असुन काल शार्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत त्यांचा गोठा आणि गोठ्यातील शेतीमाल कांदा, २ एक्करमधील गोळा केलेले ठिबक तसेच १ एक्कर मधील स्प्रिंकलर, शेतीकामासाठी आवश्यक आवजारे आणि सागवानाची झाडे यांचे एकुण जवळपास अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले असुन गोठ्याच्या जवळुन जाणाऱ्या विद्युत तारेच्या शार्टसर्कीटमुळे आग लागल्याचे शेतकरी बापुराव नरहरी आजबे यांनी म्हटले आहे. आज दि.१९ रोजी सकाळी त्यांचा मुलगा शेतावर घरी पाणी नेण्यासाठी आला असता गोठा आगीत भस्मसात झाल्याचे कळाले.

सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी संबंधित प्रकरणात फोटो आणि व्हिडिओ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना पाठवुन आगीची कल्पना देत शेतकऱ्याशी फोनवरून बोलणे करून दिले. संबंधित प्रकरणात पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना सुचना देतो असे तहसीलदार शेळके म्हणाले.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा उपक्रमात सहभागी व्हा

## २२ एप्रिल ते १ मे या कालावधीत राज्यात विविध उपक्रम होणार –मंत्री पंकजा मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन म्हणजे दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन म्हणजे १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.


पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे. नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानता सहभागी व्हावे* श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा




जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण ववातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत. २२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायचे आहे.



ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत , ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे. याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील याच्यामध्ये सहभाग घ्यावा. नदी – नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. रीड्यूस, री युज आणि रिसायकल या त्रिसूत्रीचा प्रयोग करणाऱ्यांचा होणार सत्कार त्यानंतर दि. २५, २६ आणि २७ एप्रिल या तीन दिवसांमध्ये विविध संघटना, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून रीड्यूस, री युज आणि रिसायकल या तत्त्वाप्रमाणे म्हणजे, आपण कुठल्याही चुकीच्या गोष्टींचा वापर कमी करणे म्हणजे रीड्यूस करणे, त्याचबरोबर कोणत्याही चांगल्या गोष्टी ज्या आपण परत परत वापरू शकतो त्यांचा रीयूज करणे आणि कुठल्याही गोष्टी जसे पाणी रिसायकल करतो आणि ते वापरतो त्यामुळे आपण वसुंधरेचा म्हणजे पृथ्वीचा फार मोठा फायदा त्याच्यामधून होतो आणि पर्यायी आपल्याला त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे या त्रिसूत्री चा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले. श्रीमतीमुंडे म्हणाल्या की, रीड्यूस, री यूज आणि रिसायकल या तत्त्वावर कोणी जर अत्यंत चांगले प्रयोग केले असतील, तर या प्रयोगांचा सन्मान एक मे रोजी महाराष्ट्रदिनी ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते त्या त्या जिल्ह्यामध्ये होईल. तसेच हे प्रयोग राज्य पातळीवर मागवून यांच्यामधले उपयुक्त प्रयोगाचे कौतुक करून त्यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच अश्या प्रयोगाचा उपयोग विविध योजनामध्ये करण्याचा विचार आहे, असेही त्यांनी सांगितले. घोषवाक्य स्पर्धा घेऊन विजेत्यांना गौरविणार दि . २८, २९ व ३० एप्रिल या तीन दिवसांमध्ये सर्वांनी पर्यावरण बचाव वसुंधरा सजाव या अभियानाच्या माध्यमातून घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यातील उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्यांचा सन्मान हा महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात येईल. तसेच या घोषवाक्याचा समावेश महाराष्ट्र दिनाच्या संचलनात देखील करण्यात येईल. प्रत्येक जिल्ह्यामधून तीन असे घोषवाक्य घेऊन राज्यस्तरावर तीन उत्कृष्ट घोषवाक्य निवडण्यात येतील. याचा वापर महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या जाहिरातींमध्ये केला जाईल. उत्कृष्ट तीन घोषवाक्य करणाऱ्याचा राज्यस्तरावर सन्मान करण्यात येईल. २२ एप्रिल ते १ मे या कालावधीत आयोजित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोकप्रतिनिधी तसेच सामान्य नागरिक यांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.



बीड – अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत आणि सौ. सविता राऊत यांच्या लग्नाच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त हॉटेल सनराईज बीड येथे त्यांना शुभेच्छापर आशीर्वाद देताना आमदार मा. पंकजभाऊ भुजबळ

## बडतर्फ पीएसआय रणजीत कासलेकडून व्यावसायिकाची सहा लाखांची फसवणूक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बडतर्फ पोलीस अधिकारी आणि राजकीय नेते यांच्या गंभीर आरोपांची राळ उडवून वादग्रस्त ठरलेल्या बडतर्फ पीएसआय रणजीत कासलेचा आणखी एक कारनामा समोर आला आहे. पीएसआय रणजीत कासले याने मैत्रीच्या नात्याचा गैरफायदा घेत तब्बल ६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप अंबाजोगाई येथील व्यावसायिक सुधीर छगनराव चौधरी यांनी केला आहे. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसात कासले याच्यावर फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.





सुधीर चौधरी हे अंबाजोगाई येथे कुनाल इंटरप्रायजेस नावाने एनर्जी ड्रिंकची एजन्सी चालवतात. त्यांचे अंबाजोगाई शहर व ग्रामीण पोलिस स्टेशनमधील अनेक पोलिस अधिकाऱ्यांशी चांगले संबंध आहेत. याच ओळखीच्या माध्यमातून त्यांची ओळख तत्कालीन पी.एस.आय. रणजीत कासले याच्याशी झाली. चौधरी यांच्या तक्रारीनुसार, एप्रिल २०२४ मध्ये कासले याने आपल्या आईची प्रकृती खालावली आहे, असा बनाव रचून चौधरी यांच्याकडून प्रथम विविध फोन पे नंबरवरून एक लाख रुपये घेतले. यानंतर १५ एप्रिल रोजी, दवाखान्याच्या खर्चासाठी रोख रक्कम लागल्याचे सांगून रेस्ट हाऊस अंबाजोगाई येथे भेट घेऊन पाच लाख रुपये कॅश स्वरूपात घेतले. हे पैसे चौधरी यांनी आपल्या वडिलांच्या खात्यातून काढून दिले होते. या वेळी चौधरी यांच्यासोबत ◀◀ पान ३ वर

## पांगरी येथे आज व उद्या दोन दिवशीय हनुमान यात्रा उत्सव

पिंपळवंडी । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पांगरी येथील बीड जिल्ह्यातील भाविक–भक्तांचे श्रद्धास्थान व जागृत देवस्थान पांगरीचा मारुती या देवतेची आज सोमवार व उद्या मंगळवार असा दोन दिवस हनुमान यात्रा उत्सव संपन्न होत आहे.नवसाला पावणारा म्हणून पांगरीच्या मारुतीची आख्यायिका आहे.यात्रा प्रित्यर्थ सोमवार दि.२१/०४/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता श्री क्षेत्र पैठण,श्री क्षेत्र शनीचे राक्षसभूवन येथून कावडीने आणलेल्या पवित्र गंगेचे पाणी श्री हनुमंतास गंगा जलाने स्नान घालून अभिषेक तसेच महानैवेद्य कार्यक्रम व रात्री ९ वाजल्यापासून



लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम सुरू होऊन मंगळवार रोजी सकाळी ६ वाजता संपणार आहे.तसेच मंगळवार दि.२२/०४/२०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.विठ्ठल ◀◀ पान ३ वर

## वनक्षेत्रातील पाणवठे कोरडेठाक

### तहानलेल्या वन्य प्राण्यांची मानवी वस्तीकडे धाव

लिंबागणेश । प्रतिनिधी

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला असून परीणामी साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असून बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी, लगत असलेल्या वनक्षेत्रातील हरिण, मोर, लांडोर,वानर आदि वन्यजीव वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने गाव तलावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.काही वर्षांपूर्वी पोखरी (घाट) येथील गावतलावावर पाण्याच्या शोधार्थ आलेल्या लांडोराचा कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यु झाला होता. वनविभागाने कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत मात्र त्यात



नियमित पाणी सोडण्यात येत नाही.महिनाभरापुर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. वनविभागाने वन्यप्राण्यांसाठी नियमित पाणवठ्यात पाणी सोडणे आवश्यक आहे.परंतु त्यात नियमितता नसल्याने काही पाणवठे कोरडेठाक तर काही पाणवठ्यात शेवाळ आढळून आले आहे. पिंपरनई शिवारातील पाणवठा रोडलगत बांधण्यात आला असुन रोडवरून जाणाऱ्या वाहनांच्या धडकेने वन्यजीव मृत्युमुखी पडल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. वनविभागाने नियमित वन्यप्राण्यांसाठी पाणवठ्यात पाणीपुरवठा करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## भारतीय बौद्ध महासभेच्या महिला तालुका अध्यक्षपदी मंदाताई साळवे यांची निवड

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा पुर्व अंतर्गत माजलगाव तालुक्यातील सांची बुद्ध विहार, डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत या ठिकाणी महिला तालुका कार्यकारीणी निवडीची बैठक आयोजित करण्यात आली या बैठकीत भारतीय बौद्ध महासभेत विविध पदावर कामकरत



आसणा–या मंदाताई साळवे यांची तालुका महिला अध्यक्ष पदी निवड करण्यात आली तसेच तालुका सरचिटणीस पदी सुरेखा उर्फ कोमल डोंगरे तर कोषाध्यक्ष पदी अनुराधा साळवे याची निवड करण्यात आली.या बैठकीच्या अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हा अध्यक्षा कमलताई डोंगरे ह्या होत्या तसेच या बैठकीसाठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्वचे अध्यक्ष आद.ॲड बी. बी . धन्वे,जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे,जिल्हा महिला संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे,जिल्हा संस्कार सचिव शाम वाघमारे,जिल्हा महिला संस्कार सचिव संजिवनीताई धन्वे,आशा ताई मोरे,जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे,एन बी राजभोज,जिल्हा संरक्षण सचिव,पुष्पाताई गायकवाड,जिल्हा संघटक शोभाताई भोजने, शारदाताई तांगडे,बी सी डोंगरे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे ,सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते, संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे सह जिल्हा तालुका पदाधिकारी व महिला उपासीका यांची उपस्थिती होती या प्रसंगी मान्यवरांकडुन नवनिर्वाचित महिला कार्यकारिणीला शुभेच्छा देण्यात आल्या या बैठकीचे सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा कोषाध्यक्षा भावनाताई कांबळे यानी केले तर आभार प्रदर्शन व शरनतय घेऊन बैठकीचा समारोप करण्यात आला.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्काराने कल्याण घोलप सन्मानित



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा शाखा बीड याच्याकडून दरवर्षी उपक्रमशील व आदर्श शिक्षकांचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरव केला जातो. सौंदाना जिल्हा परिषद शाळेतील उत्कृष्ट शिक्षक कल्याण बापुराव घोलप यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सामाजिक न्यायभवन सभागृहात पार पडलेल्या पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून उपशिक्षणाधिकारी मैनाताई बोराडे,जेष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी भगवान सोनवणे ,शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब मारणे,सचिव कैलास दहातोंडे,कोषाध्यक्ष इदगे, जिल्हाध्यक्ष भगवान पवार,राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक सोमनाथ वाळके,शिक्षक संघाचे सर्व तालुकाध्यक्ष, महिला पदाधिकारी उपस्थित होते.

कल्याण घोलप हे विद्यार्थी प्रिय शिक्षक आहेत.शालेय अध्यापनासोबतच ते शाळेतील माजी ◀◀ पान ३ वर

# महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जगातील सर्वोत्तम गुरू शिष्याचं नातं - डॉ.राजेश इंगोले

## फुले–आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव सोहळा अंबाजोगाईमध्ये जल्लोषात साजरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महात्मा ज्योतीराव फुले यांचे क्रांतिकारी विचार समाजात तेवत ठेवण्याचे कार्य घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी केले. तसेच महात्मा फुले यांना अपेक्षित स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि राष्ट्रीय एकात्मता यांना मूर्त स्वरूप देण्याचे कार्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या द्वारे करून दाखवले म्हणून प्रत्यक्षात महात्मा फुले यांना न भेटताही,त्यांच्या जातीचे नसतानाही डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना गुरु मानून त्यांचे विचार समाजात रुजवून त्यांना खरी गुरुदक्षिणा दिली. शिष्याने गुरूच्या इच्छांना अशा प्रकारे पूर्ण करणे हे जगातील एकमेवाद्वितीय उदाहरण आहे त्यामुळेमहात्मा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर हे जगातील सर्वोत्तम गुरू शिष्याचं नात आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ तथा व्याख्याते डॉ राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले व संविधान निर्माते युगप्रवर्तक महापुरुष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त ज्योतिनगर, अंबाजोगाई येथे आयोजीत कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक व्याख्याता म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त लष्करी अधिकारी गुलाबराव वाघमारे, नगर परिषद अंबाजोगाईचे मल्हारी जोगदंड, सौ सारुक काकू,सौ लता शिंदे ,सौ उखळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना




डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा ज्योतीराव फुले यांनी समाजात विषमता पेरणाऱ्या, जातीच्या आधारे श्रेष्ठत्व ठरवणाऱ्या मनुस्मृतीला जाळले गेले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली होती ती डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पूर्ण केली, बहुजनांना स्पृश्य अस्पृश्यतेमुळे सार्वजनीक ठिकाणी पाणी पिण्यास परवानगी नव्हती त्यामुळे महात्मा फुले यांनी आपला पिण्याच्या पाण्याचा हौद त्यांच्यासाठी रिकामा करून दिला त्याचप्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत एकूण ३९५ कलम लिहिले आणि महात्मा फुले पुण्यात ज्या ठिकाणी राहिले त्या घराचा क्रमांक ३९५च होता, हे करून बाबासाहेब आंबेडकरांनी घटना ही महात्मा फुले यांच्या स्वप्नांची केलेली पूर्तता होती असे दिसते. स्रियांच्या गुलामगिरीबद्दल, श्रमिक शेतकरी कामगार दिननदलित उपेक्षित, वंचित यांच्या हाल अपेष्टा महात्मा फुले ओळखून होते त्यांच्या हालअपेष्टा दूर करण्याचा प्रयत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आख्या हयातीत केला. त्यामुळे केवळ महात्मा फुले यांना शाब्दिक गुरू न मानता डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांच्या क्रांतिकारक समाजसुधारणावादी विचारांना प्रत्यक्ष भारतीय जनमानसात उतरवण्याचा प्रयत्न केला त्यामुळे फुले आणि आंबेडकर हे गुरू शिष्याचं जगातील सर्वोत्तम उदाहरण आहे असे मत डॉ राजेश इंगोले यांनी मांडले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्राचार्य कमलाकर कांबळे यांनी महात्मा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करताना मनस्वी आनंद झाला आहे असे सांगत या महापुरुषांचे विचार डोक्यावर नाही तर डोक्यात घेऊन त्याचा जागर केला पाहिजे असे मत व्यक्त केले. ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

सोमवार, दि.२१ एप्रिल २०२५ | पान ७

# मोबाइल दुकान फोडून ५७ हजारांचा ऐवज लंपास; १६० सेकदात शटरचे दोन कुलूप तोडले

**दौंड । प्रतिनिधी**

दौंड शहराच्या भरबाजारपेठेतील एक मोबाइल विक्री दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी दुकानातील ५७ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. तर भरचौकातील अन्य एका गॅस एजन्सी दुकानाचे शटरच्या कुलूप लावण्याच्या दोन कड्या अवघ्या १६० सेकंदात तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला होता.



शहरातील दौंड - सिध्दटेक अष्टविनायक मार्गावर भंगाळे हॉस्पिटल समोरील श्री गणेश मोबाइल शॉपी येथे मध्यरात्री चोरी झाली. चोरट्यांनी शटर उचकटून दुकानातील दोन नवीन व दोन जुने मोबाइल हॅण्डसेट व रोख ३४ हजार रूपये, असा एकूण ५७ हजार १०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. या बाबत दुकानाचे मालक नितीन सलामपुरे यांनी दौंड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील हिंदुस्तान पेट्रोलियमचे मेसर्स ओझा गॅस एजन्सी या दुकानाच्या शटरच्या कुलूप लावण्याच्या दोन कड्या तोडून आत प्रवेश केला. पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास अवघ्या दोन मिनिट व चाळीस सेकंदामध्ये चोरट्यांनी दोन कड्या तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी मोबाइल हॅण्डसेट मधील बॅटरीच्या उजेडात आतील भागात जाऊन पाहणी केल्याच्या नोंदी आहेत. या बाबत गॅस एजन्सीचे वितरक गोविंद ओझा यांनी सांगितले की, चोरट्यांनी दुकानाचे शटर तोडून आत प्रवेश केला परंतु यामध्ये दुकानातील काही चोरीस गेले नाही.

भरचौकातील ओझा गॅस एजन्सीच्या सीसीटीव्ही कॅमेर्यांमध्ये अंदाजे २० ते २५ वयोगटातील तीन युवक शटर तोडताना दिसत आहेत. अंगावर जीन्स, टी - शर्ट व पाठीवर सॅक असलेल्या या तीन युवकांचा पोलिस शोध घेत आहेत. भर बाजारपेठेतील दुकाने फोडून चोरी झाल्याने व्यापारी वर्ग आणि नागरिक धस्तावले आहेत.

# गुंतवणुकीच्या आमिषाने कोथरुडमधील नागरिकाची फसवणूक; तब्बल २३ लाखांना घातला गंडा




**पुणे । प्रतिनिधी**

देशभरात फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. देशातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना दररोज उघडकीस येत असतात. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने ज्येष्ठ नागरिकाची २३ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याबाबत ६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने अलंकार पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ नागरिक कोथरूड भागात राहायला आहेत. त्यांच्या मोबाइलवर जानेवारी महिन्यात संदेश पाठविला होता. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी दाखविले होते. त्यानुसार चोरट्यांच्या बँक खात्यात वेळोवेळी २३ लाख रुपये जमा केले. सुरुवातीला त्यांना परताव्याच्या स्वरुपात काही रक्कम दिली. नंतर चोरट्यांनी त्यांन परतावा दिला नाही, तसेच त्यांचे मोबाइल बंद केल्याचे लक्षात आले.

फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ निरीक्षक सुनीता रोकडे अधिक तपास करत आहेत. अशाच पद्धतीने चोरट्यांनी कोथरूड भागातील हॅप्पी कॉलनीत राहणाऱ्या एका ५६ वर्षीय नागरिकाची दोन लाख ८३ हजार रुपयांची फसवणूक केली आहे.

# काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटेंच्या पक्ष प्रवेशाची तारीख अन् वेळ ठरली

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेसच्या सदस्य पदाचा राजीनामा दिला असून भाजपात पक्ष प्रवेशाची तारीख आणि वेळ ठरली आहे. संग्राम थोपटे यांनी आज (२० एप्रिल) अनंतराव थोपटे महाविद्यालय फार्मसी हॉल येथे मेळाव्याचे आयोजन केलं होता. या मेळाव्यात त्यांनी मंगळवारी (दि. २२) मुंबई येथे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश करणार असल्याची घोषणा केली.

यामुळे भोरमध्ये मोठा राजकीय भूकंप होणार आहे? राज्याच्या आणि पुण्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ होणार असून, भोरचे माजी आमदार संग्राम थोपटे हे काँग्रेसला सोडचिठ्ठी देत त्यांचा भाजपा प्रवेश निश्चित झाला आहे. त्यामुळे पुण्यात काँग्रेसला मोठा धक्का बसणार आहे.



संग्राम थोपटे हे भोरमधील काँग्रेसचे माजी आमदार असून तीन वेळेस ते या मतदारसंघातून विजयी झाले होते. तर त्यांचे वडील अनंतराव थोपटे हे सहा वेळा भोर विधानसभेचे आमदार होते. विधानसभा निवडणुकीत संग्राम थोपटे यांना पराभवला सामोरे जावे लागले आहे. थोपटे हे तीनवेळा आमदार झाले. मात्र काँग्रेसची सत्ता असतानाही पक्षश्रेष्ठींनी त्यांना मंत्रिपदावरून डावलले. विधानसभा निवडणुकीतील पराभव संग्राम थोपटे यांच्या जिव्हारी लागला आहे.

कोण आहेत संग्राम थोपटे ?

संग्राम थोपटे हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री अनंतराव थोपटे यांचे पुत्र असून, भोर तालुक्यात त्यांचा ठसा आहे. त्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसणार आहे, असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

संग्राम थोपटेंचा राजकीय प्रवास सोनिया गांधींचे निकटवर्तीय अनंतराव थोपटेंचे संग्राम थोपटे पूत्र

संग्राम थोपटेंना वडिलांपासून राजकीय वारसा मिळाला २००२ मध्ये संग्राम थोपटे भोर पंचायत समितीमध्ये उपसभापती झाले

२००९ मध्ये भोर मतदारसंघातून विजय मिळवत पहिल्यांदा संग्राम थोपटे आमदार झाले

त्यानंतर २०१४ आणि २०१९च्या विधानसभेत विजय मिळवत संग्राम थोपटेंनी हॅटट्रिक केलीविधानसभेत विजयाची हॅटट्रिक केलेल्या संग्राम थोपटेंना २०२४मध्ये पराभव स्वीकाराव लागला.

# नवीन जागा खरेदीवरून जुन्नर बाजार समितीत वाद

**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव येथील उपबाजार केंद्रामध्ये सहा एकर जागेत तरकारी, टोमॅटो, धना मार्केट सुरू आहे. पुणे-नाशिक महामार्गालगत मारुती शोरूमशेजारी १३ एकर जागा गेल्या काही वर्षांपासून पडून आहे. असे असताना पुन्हा २८ कोटी ४४ लाख रुपये खर्च करून वळणवाडी येथील १० एकर जागा बाजार समितीने खरेदी करू नये, अशी मागणी बाजार समितीचे संचालक माऊली खंडागळे व संतोष चव्हाण यांनी केली आहे. त्यांनी याबाबतचे निवेदन खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, विघ्नहरचे अध्यक्ष सत्यशील शेरकर व भाजपा नेत्या आशाताई बुचके यांना रविवारी (दि.२०) दिले.




या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पुणे-नाशिक महामार्गालगत मारुती शोरूमशेजारी १३ एकर जागा गेल्या अनेक वर्षापासून तशीच पडून आहे. त्या ठिकाणी बाजार समितीने अद्याप शेतकरी हिताचा कोणताही उपक्रम सुरू केला नाही. त्या जागेचा कोणताच उपयोग न करता पुन्हा १० एकर जागेची गरज काय? असा सवाल या दोन संचालकांनी उपस्थित केला. बाजार समितीने ही जागा खरेदी करू नये व बाजार समितीला ही जागा खरेदी करण्यास या नेते मंडळींनी विरोध करावा, अशी मागणी या दोन संचालकांनी निवेदनात केली आहे.

या निवेदनात त्यांनी पुढे म्हटले आहे की, नवीन संचालक मंडळ दोन वर्षापासून अस्तित्वात आले असून या संचालक मंडळांनी शेतकरी हिताचा कोणताही मोठा निर्णय घेतलेला नाही. शेतकरी अपघात विमा, स्वस्तात शेतकऱ्यांना इतर ठिकाणी जेवणाची सुविधा अशा उपाययोजना केल्या जाव्यात, अशी मागणी करून देखील हे विषय मार्गी लागलेले नाही. नारायणगावच्या टोमॅटो मार्केटमध्ये टोमॅटो विक्रीला आणल्यावर शेतकऱ्यांना पट्टी दिली जावी, ही गेले अनेक दिवसाची मागणी देखील बाजार समितीकडून मार्गी लागत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

ओतूर, आळेफाटा, जुन्नर व बेल्हे या ठिकाणी जागेची गरज असताना त्या ठिकाणी जागा खरेदी केली जात नाही. परंतु वळणवाडीच्या जागेमध्ये कोणाच्यातरी व्यक्तिगत फायदा असल्यामुळे ही जागा खरेदी करण्याचा घाट घातला जात असल्याचा या दोघांचा आरोप आहे. बाजार समितीच्या पैशाचा अशाप्रकारे जमीन घेण्यासाठी दुरुपयोग होऊ नये. यात आपण नेतेमंडळींनी शेतकरी हितासाठी लक्ष घालावे, अशी मागणी मागणी खंडागळे व संतोष चव्हाण यांनी केली आहे.

# पोलीस असल्याच्या बतावणीने ज्येष्ठांना लुटणारा गजाआड

**पुणे । प्रतिनिधी**

पोलीस असल्याच्या बतावणी ज्येष्ठांना लुटणारा चोरट्याला गुन्हे शाखेच्या युनिट सहाने अटक केली. चोरट्याकडून आठ गुन्हे उघडकीस आले आहे. त्याने शहराच्या वेगवेगळ्या भागासह सासवड परिसरात गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. चोरट्याकडून साडेसात लाख रुपयांचे दागिने आणि दुचाकी जप्त करण्यात आले आहेत.

हमीद अफसर खान ( ३०, रा. पठारे वस्ती, लोणी काळभोर, पुणे-सोलापूर रस्ता) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. पुणे शहर, तसेच परिसरात पादचारी ज्येष्ठ नागरिकांकडे पोलीस असल्याची बतावणी करुन त्यांना लुटण्याचे गुन्हे घडले होते. पोलीस असल्याची बतावणी करुन खान याने ज्येष्ठांकडील दागिने चोरुन नेले होते.



या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेच्या युनिट सहाकडून करण्यात येत होता. ज्येष्ठांना लूटणारा चोरटा हमीद खान हा लोणी काळभोर परिसरातील स्मशानभुमीजवळ येणार असल्याची माहिती गस्त घालणारे पोलीस कर्मचारी नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला संशयावरुन ताब्यात घेतले.


चौकशीत खान आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदाराने पोलीस असल्याची बतावणी करुन ज्येष्ठ नागरिकांना लुटल्याची कबुली दिली. खान आणि साथीदाराने पर्वती, कोथरूड, कोंढवा, सिंहगड रस्ता, भारती विद्यापीठ, तसेच सासवड परिसरात लुटमारीचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडून सात लाख ६८ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि दुचाकी असा आठ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अतिरिक्त पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट सहाचे पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहायक निरीक्षक मदन कांबळे, उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, बाळासाहेब सकटे, रमेश मेमाणे, सुहास तांबेकर, सचिन पवार, ऋषीकेश ताकवणे, ऋषीकेश व्यवहारे, बाळासाहेब तनपुरे, गणेश डोंगरे, नितीन घाडगे, शेखर काटे, प्रतिक्षा पानसरे, कीर्ती नरवडे यांनी ही कामगिरी केली.

# वाहनांत घरगुती गॅस भरताना स्फोट; सुदैवाने मोठी दुघर्टना टळली

**पुणे । प्रतिनिधी**

मारुती व्हॅनमध्ये बेकायदा गॅस भरणे पळसदेव (ता. इंदापूर) येथील एकाला चांगलेच महागात पडले. घरगुती गॅस भरताना शनिवारी (दि. १९) सकाळी ९ च्या सुमारास स्फोट होऊन गाडीने पेट घेतला. सुदैवाने उपस्थित व शेजारी खेळत असलेली लहान मुले बचावली. नजीकच्या इतर टाक्यांनी पेट घेऊन स्फोट झाला असता तर मोठा अनर्थ घडला असता. यामुळे अनधिकृत गॅसचे रॅकेट पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.



अनधिकृतरीत्या गॅस सिलिंडर गोळा करून मारुती व्हॅनमध्ये एलपीजी गॅस भरत असताना अचानकपणे गॅस लिकेज होऊन स्फोट झाला. यामध्ये वाहनाने पेट घेतला आणि आग नियंत्रणाबाहेर गेली. त्या ठिकाणी लहान मुले खेळत होती. तसेच आणखी पाच ते सहा सिलिंडर होते. त्यातील एखादी जरी फुटली असती तर मोठी दुर्घटना घडली असती.

दरम्यान, लोणी एमआयडीसी कंपनीतील काही अधिकार्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ अग्निशामक दलाला फोन लावून बोलवून घेतले. अग्निशामक दलाने आग आटोक्यात आणली.

# शिरूर तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी २३ एप्रिलला आरक्षण सोडत

**शिरूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार, शिरूर तालुक्यातील ९६ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग आणि महिला यांच्यासाठी आरक्षण निश्चित करण्याच्या उद्देशाने सोडत आयोजित करण्यात आली आहे. ही सोडत २३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता शिरूर तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील सभागृह क्रमांक १ येथे होणार आहे, अशी माहिती तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी दिली.

पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश क्रमांक पसप-२/कावि/४०६/२०२५, दिनांक १७/०४/२०२५ अन्वये अनुसूचित आणि बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांसाठी विविध प्रवर्गांसाठी आरक्षण निश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत.

या सोडतीसाठी माजी लोकप्रतिनिधी, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच आणि इतर मान्यवरांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पारदर्शक आणि नियमानुसार पार पडेल. ग्रामविकास आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून ही सोडत अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

# बिबवेवाडीत तरुणावर कोयत्याने हल्ला; सपासप वार करुन केले जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

बिबवेवाडीत जुन्या वादातून तरुणावर कोयत्याने वार करून त्याच्या खूनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. पोलिसांनी याप्रकरणी एकाला अटक केली असून, साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे. ओंकार शाहूराज जाधव (वय २५, रा. प्रतिभा निवास, बिबवेवाडी) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी आदित्य कांबळे (रा. वैभव सोसायटी, कॅनरा बँकेजवळ, बिबवेवाडी) याला अटक केली आहे. त्याच्याबरोबर असलेले साथीदार देवेन पवार (रा. गॅस गोदामाजवळ, बिबवेवाडी), मेहुल धोखा (रा. गोकुळनगर, कात्रज) यांच्यासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जाधवने याबाबत बिबवेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, ओंकार जाधव गुरुवारी रात्री त्याचा मित्र विजय चौहान याच्या दुचाकीवरुन निघाला होता. जाधव व पवार यांच्यात काही दिवसांपूर्वी वाद झाले होते. जाधवने पवार याला शिवीगाळ केल्याने तो चिडला होता. बिबवेवाडीतील महेश सोसायटीसमोर आरोपी पवार आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांनी जाधव याच्यावर कोयत्याने वार केले. गंभीर जखमी झालेल्या जाधवला खासगी रुग्णालयात दाखल केले. तेव्हा आरोपी पवार आणि साथीदार धोखा हे खासगी रुग्णलायात गेले. पोलिसांकडे तक्रार करु नको. उपचाराचा खर्च करतो, अशी धमकी त्याला दिली. पोलीस उपनिरीक्षक साळुंखे तपास करत आहेत.

# शिवनेरीवर गेलेल्या पर्यटकांवर आग्या मधमाशांचा डंख, अनेकजण जखमी, दीड महिन्यातला तिसरा हल्ला

**पुणे । प्रतिनिधी**

शिवनेरी किल्ल्यावर आग्या मदमाशांनी पर्यटकांवर अचानक हल्ला चढवला. या घटनेत अनेक पर्यटक जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी जुन्नर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शनिवारी विकेंड असल्यामुळे किल्ल्यावर पर्यटकांची मोठी गर्दी होती. याच गर्दीच्या वेळी मधमाशांनी हल्ला केल्याने एकच घबराट उडाली. काही दिवसांपूर्वी किल्ले शिवनेरीवर शिवप्रेमींवर मधमाशांच्या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले होते. गेल्या दीड महिन्यातला हा तिसरा हल्ला असून आता शिवनेरीवर येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेवर वनविभागाकडून ठोस पावलं उचलणं गरजेचं आहे.




अनेकदा गडावर जाणाऱ्या पर्यटकांकडून मधमाशांना डिवचण्याचा प्रकार घडल्याचेही काही दिवसांपूर्वी समोर आले होते. त्याची चौकशीही करण्यात आली होती. मात्र, वारंवार मधमाशांच्या हल्ल्यामुळे आता पर्यटकांची सुरक्षा चिंतेचा विषय ठरतेय.

उष्णतेच्या पाऱ्याने मधमाशा आक्रमक सध्या उष्णतेचा पारा प्रचंड वाढला आहे. त्यामुळे मधमाशांचा स्वभाव अधिक आक्रमक झाल्याने हा हल्ला झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. (ढशाशिर्रीीश ठळीश) शिवनेरीवर सातत्याने मधमाशांचे वाढते हल्ले लक्षात घेता पर्यटकांना किल्ल्यावर येताना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. मधमाशांच्या हल्ल्यामुळे शिवजयंतीनिमित्त गडावर मोठी गर्दी होती.यावेळीही पर्यटकांवर मधमाशांनी हल्ला चढवला होता. यात ४७ जण जखमी झाले होते.यानंतर काही काळासाठी शिवनेरी गड पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला होता. दरम्यान, आज सकाळी विकेंड असल्याने शिवनेरी गडावर पर्यटकांची गर्दी होती.तेवढ्यात मधमाशांचे मोहोळ उठले. आग्या मधमाशांनी पर्यटकांवर हल्ला चढवला. यात लहान मुलांसह महिला व तरुण पर्यटकांचा समावेश आहे.गेल्या दीड महिन्यात हा तिसरा हल्ला आहे. शिवनेरी किल्ल्यावर मधमाशांच्या वसाहती अनेक वर्षांपासून कायम आहेत. काही बेशिस्त, हुल्लडबाज पर्यटकांमुळे मधमाशांना त्रास होतो. यामुळे दरवर्षी प्रामुख्याने उन्हाळ्यात मधमाशांचा पर्यटकांवरील हल्ल्यांच्या घटना वारंवार घडत आहेत. या घटनांमध्ये शेकडो पर्यटक, लहानमुले गंभीर जखमी झाले आहेत. तर अनेक परदेशी पर्यटक देखील जखमी झाले आहेत. या घटनेनंतर वनविभागाच्या उपाययोजनांवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. पर्यटकांनी अधिक काळजी घ्यावी, शांतता राखावी आणि किल्ल्यावर मदमाशांचे अस्तित्व असलेल्या भागांत जाऊ नये, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

# सोलारसाठी जास्तीचे पैसे मागणाऱ्या सोलार कंपनीवर होणार कारवाई; महावितरणने केले आवाहन

**बारामती । प्रतिनिधी**

सोलार बसविण्यासाठी शेतकऱ्यांकडून खड्डे खोदून घेणे, वाहतुकीसाठी पैसे मागणे तसेच त्यांना सिमेंट, वाळू आणण्यास सांगणाऱ्या मे. रोटोमॅक सोलार कंपनीने केलेल्या कामाची महावितरणकडून पाहणी केली जाणार आहे. तोपर्यंत कंपनीचे ४० सोलारपंपाची कामे केल्याचे जवळपास १ कोटी १६ लाखाचे देयक अदा करणार नसल्याचे महावितरण कंपनीने स्पष्ट केले असून, शेतकऱ्यांनी कोटेशन व्यतिरिक्त रक्कम कोणाला देऊ नये असे आवाहन महावितरणने केले आहे.




शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरणतर्फे 'मागेल त्याला सौर कृषीपंप योजना' सुरु आहे. तर यापूर्वी केंद्रसरकारच्या 'कुसुम-बी' योजनेतून सौर पंप आस्थापीत केले आहेत. अनुसुचित जाती व जमातीमधील शेतकऱ्यांना ९५ टक्के तर इतर वर्गवारीतील शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदानातून सौर पंप मिळतात. त्यासाठी तीन अश्वशक्तीला (एचपी) अनुसुचित जाती व जमातीकरिता ११४८६ रुपये, इतरांकरिता २२९७१ रुपये, पाच अश्वशक्तीसाठी अनुक्रमे १६०३८ रुपये व ३२०७५ रुपये आणि ७.५ अश्वशक्तीला २२४६५ रुपये व ४४९२९ रुपये भरावे लागतात. भरलेल्या रकमेतून सोलारपंप आस्थापित करण्यापासून त्याचे कार्यान्वयन, देखभाल दुरुस्ती आदींचा समावेश केलेला आहे. त्यामुळे कोटेशनच्या रकमे व्यतिरिक्त कोणतेही आगाऊ शुल्क घेतले जात नाही.

शेतकऱ्यांनीही अशी आगाऊ रक्कम कोणाला देऊ नये अथवा साहित्य आणून देऊ नये. त्यासाठी कोणी पैशाची मागणी करत असेल तर नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा. तिथे तक्रारीची दखल न घेतल्यास बारामती मंडल कार्यालयातील नोडल अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता अरविंद भाग्यवंत यांच्या ७८७५७६८०५१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करावी. आलेल्या सर्व तक्रारींची महावितरणकडून चौकशी केली जाईल. तसेच सोलार कंपनीचा दोष आढळून आल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे महावितरणने कळविले आहे.